# महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

## ५१ वा वार्षिक अहवाल

## वर्ष २०१२-१३

### कंपनीची माहिती

| | | |
|---|---|---|
| संचालक मंडळ | : | श्री. आनंद बी. कुलकर्णी, भा. प्र. से.<br>श्री. सुरेंद्रकुमार बागडे, भा. प्र. से.<br>श्री. रमेश देवकर, भा. प्र. से.<br>श्री. शिवाजी दौंड, भा. प्र. से.<br>श्री. ए. एल. जऱ्हाड, भा. प्र. से. |
| व्यवस्थापकीय संचालक | : | श्री. शिवाजी दौंड, भा. प्र. से. |
| सह. व्यवस्थापकीय संचालक/<br>मुख्य वित्तीय अधिकारी | : | श्री. राजेंद्र मडके |
| कंपनी सचिव | : | श्री. कुश केसरी |
| बँकर्स | : | स्टेट बँक ऑफ इंडिया |
| वैधानिक लेखापाल | : | ओम प्रकाश चपलोत अँड कंपनी.<br>सनदी लेखापाल, मुंबई. |
| नोंदणीकृत कार्यालय | : | कृपानिधी,<br>९, वालचंद हिराचंद मार्ग,<br>बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४००००१ |

# संचालक मंडळाचा अहवाल

दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाच्या लेखापरिक्षित लेखा विवरणपत्रे व त्यावरील वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालासह महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा ५१ वा वार्षिक अहवाल सादर करताना आपल्या संचालकाना आनंद होत आहे.

## १. वित्तीय परिणाम :

| तपशील | | (रू. कोटीत) |
|---|---|---|
| | वित्तीय वर्ष २०१२-१३ | वित्तीय वर्ष २०११-१२ |
| कार्यातून मिळालेले उत्पन्न | २४२.६५ | ४८७.२३ |
| इतर उत्पन्न | १४.५७ | १०.७४ |
| एकूण उत्पन्न | २५७.२२ | ४९७.९७ |
| खर्च | २४३.७४ | ४७५.४९ |
| करपूर्व नफा | १३.४८ | २२.४८ |
| करोत्तर नफा | ६.३८ | १४.०४ |
| भागभांडवल | १४.५० | १४.५० |
| राखीव व अतिरिक्त | ३८.०७ | ३२.३४ |

मागील वर्षातील रु. ४८७.२३ कोटीच्या तुलनेने चालू अहवाल वर्षात महामंडळाने रु. २४२.६५ कोटी रुपयांची उलाढाल केली आहे. या उलाढालीचा मागील वर्षाशी तुलनात्मक कार्यनिहाय तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशील | | (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| | | वित्तीय वर्ष २०१२-१३ | वित्तीय वर्ष २०११-१२ |
| १. | कच्चा माल, लोखंड, पोलाद आणि कोळसा | ३०.१८ | ५७.६७ |
| २. | विपणन | १९८.३३ | ४०१.५७ |
| ३. | फ्रँकिंग | ०.०८ | १.३० |
| ४. | हस्तकला | ३.२१ | ४.७५ |
| ५. | इतर | १०.८५ | २१.९४ |
| | **एकूण** | **२४२.६५** | **४८७.२३** |

### i) विपणन :

महामंडळाने विपणन विभागात २०१२-१३ या वर्षात १९८.३३ कोटी रुपयांची उलाढालीची नोंद केली आहे. गेल्या वर्षी २०११-१२ या वर्षात एकूण विक्री ४०१.५७ कोटी रुपये इतकी होती.

### ii) दर करार

महामंडळाने आरसीसी पाइप्स, पाणी साठविण्याच्या टाक्या, एअर कुलर्स, पॉलीथीन बॅग्स, स्टील फर्निचर इत्यादींचे दर करार करून महाराष्ट्रात लघुउद्योग घटकांना विपणन सहाय्य केले आहे.

### iii) हस्तकला व विक्रीदालन केंद्र

महामंडळाने पूर्वीप्रमाणे त्यांच्या नवी दिल्ली आणि मुंबई येथील विक्रीदालनामधून हस्तकला आणि हातमागाच्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री चालू ठेवलेली आहे. ज्यामुळे कारागिरांना यथोचित आधार प्राप्त झाला आहे. गतवर्षीच्या ४.७५ कोटींच्या

तुलनेत सन २०११२-१३ मध्ये महामंडळाने प्रदर्शन व विक्रीद्वारे एकूण ३.२१ कोटींची विक्री साध्य केली आहे.
पैठण येथील पैठणी केंद्रातून गतवर्षीच्या रु. ०.६३ कोटींच्या तुलनेत २०१२-१३ वर्षात रु. ०.३१ कोटींची विक्री साध्य केली आहे.

### iv) कच्चा माल

कच्च्या मालाच्या उलाढालीत सन २०११-१२ मध्ये केलेल्या रु. ५७.६७ कोटीच्या तुलनेने महामंडळाने अहवाल वर्षात रु. ३०.१८ कोटी उलाढालीची नोंद केली. अहवाल वर्षात महामंडळाने खालील कच्च्या मालाचा पुरवठा केला.

| बाब | परिमाण (मेट्रिक टन) | मुल्य (रु. कोटीत) |
|---|---|---|
| लोखंड व पोलाद | २५०.४२ | १.१३ |
| कोळसा | १३६६८९.४० | २९.०५ |
| **एकूण** | **१३६९३९.८२** | **३०.१८** |

### v) व्यापारी गोदामसेवा

सन २०११-१२ च्या रु. ४.८६ कोटीच्या तुलनेत महामंडळाने अहवाल वर्षात रु. ५.१९ कोटीचे उत्पन्न साध्य केले.

### vi) प्रदर्शने

अहवाल वर्षात महामंडळाने १४.११.२०१२ ते २७.११.२०१२ रोजी प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यात महाराष्ट्र दालन आयोजित केले होते.

### २. लाभांश

अहवाल वर्षात फारच असमाधानकारक नफ्यामुळे आपल्या संचालकांनी कोणत्याही लाभांशाची शिफारस केलेली नाही.

### ३. औद्योगिक संबंध

अहवाल वर्षात औद्योगिक संबंध सलोख्याचे होते व कर्मचाऱ्यांचे नितीधैर्य उच्च स्वरुपाचे होते.

### ४. संचालक

अहवालाच्या तारखेस कंपनीचे संचालक म्हणून खालील व्यक्ती आहेत

| अनु क्र. | नाव | पद | पत्ता |
|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद बी. कुलकर्णी, भा.प्र.से. | संचालक | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (एमएसएफसी) |
| २. | श्री. सुरेंद्र कुमार बागडे, भा.प्र.से. | संचालक | विकास आयुक्त, (औद्यो.) व सचिव (एसएमआय) |
| ३. | श्री. रमेश देवकर, भा.प्र.से. | संचालक | मुख्य कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ (केव्हीआयबी) |
| ४. | श्री. शिवाजी दौंड, भा.प्र.से. | संचालक | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मर्या. (एमएसएसआयडीसीलि.) |
| ५. | श्री. ए. एल. जऱ्हाड, भा.प्र.से. | संचालक | संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) |

### ५. लेखापरिक्षक

अहवाल वर्षाकरिता भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक, नवी दिल्ली यांच्या कार्यालयाने आपल्या महामंडळाचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मेसर्स ओम प्रकाश चपलोत अँड कंपनी, सनदी लेखापाल, मुंबई यांची नियुक्ती केली आहे.

## ६. संचालकांच्या जबाबदारीबाबतचे निवेदन

कंपनी अधिनियम १९५६ चा भाग २१७ (२अअ) अनुसार आवश्यक असलेल्या संचालकांच्या जबाबदारीबाबतचे विवरणपत्र याद्वारे मान्य करण्यात येत आहे.

i) ३१ मार्च २०१३ पर्यंतचे वार्षिक लेखे तयार करताना लागू असलेले लेखांकन मानक योग्य त्या स्पष्टीकरणासह पाळण्यात आले आहेत ज्यामध्ये वास्तवतेपासून तफावत नाही.

ii) संचालकांनी निवडलेल्या लेखांकन पध्दती नियमितपणे अंमलात आणल्या आणि कंपनीच्या वर्षभराच्या कारभाराबाबत तसेच वित्तिय वर्षअखेर होणाऱ्या नफ्याबाबत खरे व उचित दर्शन घडेल याकरिता योग्य निर्णय व अंदाज केले.

iii) कंपनी कायद्यातील तरतुदीनुसार कंपनीच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी, लबाडी व इतर अनियमितता इत्यादींचा शोध घेण्यासाठी /आळा घालण्यासाठी संचालकांनी आवश्यक ते लेखे दफ्तर ठेवण्याची योग्य व पूरेपूर काळजी घेतली आहे.

iv) संचालकानी ''चालू संस्था'' आधारे वार्षिक लेखे तयार केले आहेत.

## ७. कंपनी अधिनियम १९५६ चा भाग २१७ (२अ) अनुसार आवश्यक असलेला कर्मचाऱ्यांबाबतचा तपशिल

महामंडळाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला वार्षिक रु. ६० लाख किंवा दरमहा रु. ५ लाखापेक्षा अधिक वेतन दिलेले नाही त्यामुळे ही माहिती निरंक आहे.

## ८. इंधन बचत, तांत्रिक देवाण घेवाण, परकीय चलन आवक व जावक

कंपनी अधिनियम चा भाग २१७ (१) (इ) मधील महामंडळाने प्रत्यक्षतः कोणतीही उत्पादन प्रक्रिया अवलंबिली नसल्याने इंधन बचत व तांत्रिक देवाण घेवाणीचा तपशिल निरंक आहे. तसेच परकीय चलन आवक वा जावकही नाही.

## ९. आभार

आपले संचालक अहवाल वर्षात बॅन्का आणि वित्तिय संस्थानी दिलेल्या अमुल्य सेवाबाबत आणि विविध शासकीय विभाग, पुरवठादार, ग्राहक आणि सभासद यांच्या सहकार्याबाबत गौरवपूर्ण नोंद घेत आहेत. तसेच आपले संचालक महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या अमुल्य सेवेबाबतही आपल्या दप्तरी गौरवपूर्ण नोंद घेत आहेत.

दिनांक : २७/०५/२०१५ **संचालक मंडळाकरिता व च्यावतीने**

स्थळ : मुंबई

**संचालक** **व्यवस्थापकीय संचालक**

## ओम प्रकाश एस. चपलोत अँड कंपनी
## सनदी लेखापाल

१०१, वात्सल्य बिल्डिंग,
एकता को-ऑप. सोसायटी, आरटीओ जवळ,
आरटीओ रोड, अंधेरी (प.),
मुंबई ४०००५३
दूरध्वनी : ९१-२२-२६३११०५०
ई मेल opc.mum@gmail.com

# लेखापरिक्षकांचा आर्थिक विवरणाबाबतचा स्वतंत्र अहवाल

प्रति,
सभासद, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित

### आर्थिक विवरणाबाबतचा अहवाल

आम्ही महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा (कंपनी) सोबत जोडलेला दिनांक ३१ मार्च २०१२ रोजीचा ताळेबंद आणि त्याच दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षाचे महामंडळाचे नफा तोटा व रोख ओघ विवरणपत्रांचे लेखापरिक्षण केले आहे. या आर्थिक विवरणपत्रांची जबाबदारी महामंडळ व्यवस्थापनाची असून आमची जबाबदारी या विवरणपत्रांच्या लेखापरिक्षेवर आधारीत भाष्य करण्याची आहे.

### आर्थिक विवरणांबद्दलची व्यवस्थापकीय जबाबदारी :

कंपनी कायदा १९५६ च्या कलम २११ च्या उपकलम (३क) अन्वये कंपनीच्या व्यवस्थापनाला आर्थिक व्यवहारांचे निकष विचारात घेऊन कंपनीच्या आर्थिक परिस्थितीची तसेच कामगिरीची माहिती देण्यासाठी वित्तीय विवरण सादर करणे ही त्यांची जबाबदारी आहे. या अंतर्गत संपूर्ण कारभाराचे नियोजन, त्याची अंमलबजावणी तसेच अंतर्गत कारभाराचे नियंत्रण, त्याची तयारी व वित्तीय विवरणामध्ये त्याचे योग्य सादरीकरण याचेही पालन करणे आवश्यक आहे. त्यानुसार झालेल्या व्यवहारांची सत्य व सुयोग्य परिस्थिती तसेच अन्य त्रूटी किंवा गैरव्यवहारात आढळलेल्या बाबीदेखील सादर कराव्यात. त्याबाबत चुकीचे मत प्रदर्शित करू नये.

### लेखापालाची जबाबदारी :

आर्थिक बाबींवर लेखापरिक्षानुसार त्याचे मत सादर करण्याची जबाबदारी आमची आहे. चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडिया (आयसीएआय) या संस्थेने लेखापरिक्षणासाठी लेखापालांना निश्चित करून दिलेल्या निकषांच्या आधारे लेखापरिक्षण केले जाते. या निकषांना तात्विक चौकटीत बसवून त्यानुसार आढळलेल्या सर्व बाबींचे विवरण केले जाते. त्रूटी अथवा गैरव्यवहार आढळून आल्यास त्यांनाही या विवरणात समाविष्ट केले जाते.

वित्तीय व्यवहाराचे विवरण सादर करताना त्यात लेखाविषयक बाबी स्पष्ट केल्या जातात. लेखापरिक्षकाचे मत हे त्याच्या परिक्षणावर अवलंबून असते. वित्तीय व्यवहारातील त्रूटी किंवा गैरव्यवहार याबाबत चुकीचे मत सादर करण्याची जोखीम घेतली जात नाही. अशा प्रकारात कंपनी व्यवस्थापनाकडून या अंतर्गत संपूर्ण कारभाराचे नियोजन, त्याची अंमलबजावणी तसेच अंतर्गत कारभाराचे नियंत्रण, त्याची तयारी व वित्तीय विवरणामध्ये त्याचे योग्य सादरीकरण याचेही पालन झाले की नाही, याची तपासणी आवश्यक आहे. तत्कालीन परिस्थिती, अंतर्गत नियंत्रण तसेच व्यक्त झालेली मतं यातून प्रभावी अभिप्राय सादर करणे. लेखापरिक्षणात आर्थिक बाबींशी संबंधित कंपनीची धोरणंदेखील विचारात घेतली जातात. आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण, नियोजन व प्रत्यक्षात केलेले कार्य यांचा आढावा घेतला जातो.

आम्हाला विश्वास आहे की, आम्ही केलेले लेखापरिक्षण तसेच व्यक्त केलेले प्रतिकूल मत वरील सर्व बाबींचा विचार करूनच सादर केले आहे.

**प्रतिकूल मताकरिता आधार**

१. (i) कंपनीच्या व्यापार प्राप्तची येणी ७१,०३,५२,५४६ रुपये आहेत आणि देय व्यापार नावे बाकी रक्कम १५,३६,५४,६६७ आहे व ती तीन वर्षांहून अधिक कालावधीसाठी प्रलंबित आहे. त्याच्या तुलनेत अवघी रु. २,६४,८५,००० एवढीच तरतूद करण्यात आली आहे.

(ii) कंपनीच्या ८०,०७,४२७ रुपयांच्या बराच काळ प्रलंबित असलेल्या ठेवींचा आकडा मुख्यालयाच्या कारभारातला असून त्याच्या वसूलीची किंवा पुढील तीन वर्षांसाठी समायोजन करण्याची कोणतीही योजना नाही. याबाबतची व्यवहारात देखील कुठलाच तपशील आढळून आला नसल्यामुळे ही बाब संशयास्पद वाटते.

(iii) कंपनीची ८३,१७,५९३ रुपयांची भाडे वसूली बाकी असून त्याला ३ वर्षांहून अधिक काळ होऊनही कुठलीच कारवाई झालेली नाही व तरतूद केलेली नाही.

(iv) अन्य अग्रिम रकमांमध्ये इतरही दीर्घकालीन प्रलंबित रकमा असून त्यांचा आकडा ५७,७६,५७८ रुपये इतका होतो. मात्र त्यांच्या वसूलीची किंवा निश्चित समायोजनेचे कुठलेही नियोजन नसल्यामुळे या बाबी संशयास्पद आहेत. कंपनीकडे याबाबतच्या व्यवहाराची कुठलीच सविस्तर माहिती किंवा स्पष्टीकरण मिळालेले नाही.

(v) अन्य अग्रीम रकमांमध्ये १,३६,०७४ रुपयांचा समावेश असून औरंगाबाद विभागीय कार्यालय व वांद्रे फ्रँकिंग विभागातील फ्रँकिंग मशीनच्या उडीमुळे तोटा असल्याचे जाणवते. गेल्या ३-४ वर्षापासूनची ही रक्कम असून त्याबाबतच्या वसूलीची कुठलाही माहिती कंपनीने पुरवली नाही.

**वरील पहिल्या मुद्यातील (i) ते (v) पर्यंतच्या बाबींचा एकत्रित आढावा खालीलप्रमाणे :**

| तपशील | रक्कम (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| निव्वळ नफा आणि तोटा यांच्या विवरणानुसार झालेला २०१२-१३ वर्षातील निव्वळ नफा वा तोटा - | - | ६,३८,१९,४३८ |
| ३ वर्षापेक्षा जास्त व्यापार प्राप्त समायोजन तरतूद प्रलंबित | (६८,३८,६७,५४६) | - |
| ३ वर्षांपेक्षा जास्त देय व्यापार नावे बाकी | (१५,३६,५४,६६७) | - |
| ३ वर्षांपेक्षा जास्त प्रलंबित ठेवींची तरतूद प्रलंबित | (८०,०७,४२७) | - |
| ३ वर्षांपेक्षा जास्त शिल्लक असलेली भाडेवसूली तरतूद प्रलंबित | (८३,१७,५९३) | - |
| ३ वर्षांपेक्षा जास्त शिल्लक असलेली इतर अग्रिमे तरतूद प्रलंबित | (५७,७६,५७८) | |
| फ्रँकिंग मशीनमुळे झालेले नुकसान तरतूद प्रलंबित | (१,३६,०७४) | (८५,९७,५९,८८५) |
| **वरील बाबींची पूर्तता झाल्यानंतर होणारा निव्वळ नफा (तोटा)** | | **(७९,५९,४०,४४७)** |

अशाप्रकारे महामंडळाने दाखवल्याप्रमाणे रु. ६.३८ कोटींच्या नफ्याऐवजी प्रत्यक्षात रु. ७९.५९ कोटीचा तोटा झाला आहे.

२. संशयास्पद खात्यांबाबत ६२,०७८.०० (निव्वळ) रुपयांची कर्जे व अग्रीम मध्ये बाकी आहे. ही बाकी कंपनीने प्रतिलेखित (रिटर्न बॅक) केलेली नाही.

३. खर्चाच्या शेष देणींचा आकडा ५,५८,५३,८५९ रुपये असून त्यात मुंबई पोर्ट ट्रस्टच्या २,७६,७७,६६७ रुपयांचा समावेश आहे. त्यामुळे ही तपासणी पडताळा व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत. त्याचा कंपनीच्या आर्थिक विवरणपत्रातील नफ्याच्या आकेडवारीवर होणारा परिणाम मांडता येत नाही.

४. आयसीएआय संस्थेने निश्चित केलेल्या काही लेखांक मानकाचे संपूर्णतः पालन झाल्याचे आढळून आले नाही.

i) खरेदी आणि विक्रीबाबत कंपनीकडून पुरवठादारांनी अदा केलेली बिलं आणि एखाद्याच्या मालाचे विक्रेत्याकडून खरेदीदाराला झालेल्या हस्तांतरणानंतर त्याची नोंद घेतली जाते. लेखांचा आधार असलेल्या प्रमाणक ९ नुसार ही प्रक्रिया नाही. त्यामुळे या वर्षी कंपनीच्या वतीने करण्यात आलेल्या व्यवहाराच्या बाबतीत योग्य नसल्याचे दिसून येते. सवलतीच्या उत्पन्नावरील बाबी या विक्रीच्या वेळी नोंद करण्यात आल्या आहेत. वास्तविक लेखा प्रमाणक ९ नुसार हे योग्य नाही. ही सवलत निव्वळ नफा, तोटा तसेच लेखा धोरणातील बदल याबाबतच्या लेखा प्रमाणक ५ अनुसार त्या कार्यकाळातील नफा आणि तोटा यांच्या विवरणात जुळवून घेतली पाहिजे. त्यामुळे वर्षभरातील नफा आणि तोटा दर्शवित असलेल्या आर्थिक ताळेबंदात त्याचे विवरण योग्य प्रकारे आले नाही. कंपनीने लेखा प्रमाणक ९ आणि लेखा प्रमाणक ५ यांचे योग्यरित्या पालन केलेले आढळून आले नाही.

ii) स्थिर मत्तेची प्रत्यक्ष पडताळणी किंवा अन्य पद्धती मालमत्ता बदलातील लेखा प्रमाणक २८ अनुसार पाळल्या गेल्या नाहीत. वसूली करण्यात येणाऱ्या रकमेशिवाय अन्य वसूली न करण्याबाबतचे हे संकेत आहेत.
ज्याअर्थी स्थिर मत्तेची प्रत्यक्ष पडताळणी न झाल्यामुळे कंपनीला आपल्या आर्थिक विवरणात याबाबतचे खात्रीलायक स्पष्टीकरण देता आले नाही. यानुसार या मत्तेची विल्हेवाट लावल्यानंतर त्यातून मिळालेले फायदे, त्याचा पुढील उपयोग, त्यातून होणारे नुकसान आदी बाबी नफा आणि तोटा दर्शविणाऱ्या आर्थिक विवरणात असणे आवश्यक आहे. त्यामुळे स्थिर मत्तेच्या लेखांबाबत असलेले लेखा प्रमाणक १० याचे पालन झालेले नाही.

iii) आयआयटीएफ २०१२ च्या संदर्भातील लेखा प्रमाणपत्रानुसार, खर्च वगळता मिळालेले उत्पन्न २०,३२,७२५ रुपये इतके होते. मात्र, लेखा नोंदीनुसार ही रक्कम २६,०३,४३६ रुपये इतकी असल्याचे दिसून येते. या फरकाचा अद्याप ताळमेळ लागत नाही. त्यामुळे कंपनीने शासकीय अनुदानाबाबतच्या लेखा प्रमाणक - १२ चे पालन केलेले नाही.

iv) कामगारांच्या लाभांसाठी असलेल्या लेखा प्रमाणक १५, विभागीय अहवालाचे लेखा प्रमाणक - १७, संबंधित संस्थांच्या माहिती जाहीर करण्याबाबतचे लेखा प्रमाणक - १८ तसेच लीजबद्दलचे लेखा प्रमाणक - १९ यांचे तपशील कंपनीने उघडकीस आणलेले नाहीत.

५. प्रलंबित विक्रीकर, सेवा कर, कामकाज करार कर व इतर कायदेशीर प्रकरणं व त्यांच्यावरील दायित्व याबाबतची माहिती सविस्तरपणे दिली गेली नाही. त्यामुळे अनेक वर्षे अपिलीय प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या या प्रकरणांबाबतची विद्यमान स्थिती समजून येत नाही. त्यामुळे त्याचा योग्य ताळमेळ घालता येत नाही.

६. खालील शीर्षकाखाली असलेल्या शिल्लका या तपासणी पडताळा व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत.

| शीर्षक | रक्कम (रु.) |
|---|---|
| खर्चाकरिता दायित्वे | ५,५८,५३,८५९ |
| व्यापार प्राप्त | १२९,१४,१९,५९६ |
| कर्मचाऱ्यांची देणी | ९,१३,८५३ |
| बाहेरील संस्थांची देणी | ७३,०४,९३,८८९ |
| सेवा कर | १,०७,४८,३७८ |
| मिळालेल्या ठेवी | १६,४१,१८,८५३ |
| अग्रिम कर व मूळात कापलेला कर | १२,७३,४१,२४२ |
| केंद्रीय विक्रीकर | ७,९६,१९४ |
| महाराष्ट्र विक्रीकर व मूल्यावर्धित कर | १६,२९,४१६ |
| पुरवठाधारकांना अग्रिमे | ५,९५,००० |
| सुरक्षा रक्कम | ९६,६१,७४८ |
| देय व्यापार | १३९,२९,४१,३५८ |

७. खालील कर्जाच्या बाबतीत मुद्दल रकमेपेक्षा व्याज रक्कम जास्त आहे. त्यामुळे खालील अप्रतिभूत कर्जावर देय असलेल्या व्याजाची सन २००७-०८ करिता लेख्यात तरतूद करण्यात आलेली नाही.

| लेख्यांचे नाव | अप्राप्त रक्कम (रुपयांत) |
|---|---|
| उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन सुशिक्षित बेरोजगार कर्ज योजना | ४०,९२,४०८ |
| उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन बीज भांडवल योजना (३.५ टक्के) | १,५४,५२,६३० |

८. कंपनीचा व्याप आणि धंद्याचा आवाका पाहता कंपनीची अतंर्गत नियंत्रण प्रणाली फार दुर्बल आहे आणि तद्अनुषंगाने लबाडी, नुकसान लपवणे, अफरातफर इत्यादींसाठी विविध पातळींवर ही पद्धती संवेदनक्षम आहे.

९. लेखापरिक्षण करतेवेळी ३१ मार्च २०१३ पर्यंतच्या मुदत ठेवीच्या मूळ पावत्या सादर करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे त्या कालावधीत ज्या ठेवींची मुदत संपली नाही, त्याचा तपशील देता आला नाही.

१०. तपशील पुरविण्यात न आल्यामुळे याबाबतच्या रकमा तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनी त्याच्यावरील भरलेल्या व्याजाच्या रकमाबाबत मतं प्रदर्शित करता आले नाही.

११. मुख्य गोदाम आणि कार्यालय भाडे याबाबतच्या रकमाचा ताळमेळ केला गेला नाही. त्यामुळे त्याच्यावरील मत लेखा पुस्तिकेत नोंदविता आले नाही.

१२. कंपनी कायद्यातील खालील तरतूदींचे पालन करण्यात आले नाही.

i) कलम ३८३ अ अन्वये कंपनीच्या सेवेत पूर्णवेळ कंपनी सचिव नियुक्ती १० सप्टेंबर २०१२ पर्यंत करण्यात आली नसल्याचे आढळून आले.

ii) चालू वर्षात लेखापरिक्षण समितीची बैठक झालेली नाही.

**प्रतिकूल मत :**

आमच्या मते आणि प्रतिकूल मताचे परिच्छेदाआधारे नमूद केलेल्या बाबीच्या अर्थानुरूप आणि आमची माहिती व आम्हाला मिळालेल्या स्पष्टीकरणानुसार सदर लेखे व लेख्यांवरील इतर टिपण्णी यांच्या अधीन राहून कंपनी अधिनियम १९५६ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे माहिती देतात. परंतु भारतात सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखा तत्त्वास पुष्ठी देण्याबाबतचे सत्य व यथार्थ चित्रण देत नाहीत.

i) ताळेबंदाबाबत महामंडळाच्या दि. ३१ मार्च २०१३ रोजी, असल्याप्रमाणे कारभाराचे आणि

ii) नफा-तोटा हिशेब पत्रकाबाबत त्याच दिनांकास होणारा नफा,

iii) रोख ओघ विवरण पत्राबाबत त्याच दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षातील रोखे ओघाचे.

**कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांबाबतचा अहवाल :**

१. भारत सरकारच्या कायद्यातील कलम २२७ मधील उपकलम (४ए) अन्वये कंपनीला (लेखापरिक्षण अहवाल) आदेश २००३ (ऑर्डर) असून त्याच्या पूर्तीच्या अनुषंगाने सोबत पुरवणी दिली असून त्यात त्या आदेशातील परिच्छेद ४ व ५ अनुसार विवेचन आहे.

२. कायद्याच्या कलम २२७ (३) अनुसार आम्ही नमूद करतो की,

अ. आमच्या माहितीप्रमाणे व विश्वासानुसार लेखापरिक्षेसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हाला मिळाली आहेत.

ब. आमच्या मते व लेखापुस्तकांच्या तपासणीवरून आम्हास आढळून आल्याप्रमाणे कायद्यानुसार आवश्यक असलेली सर्व लेखापुस्तके कंपनीने ठेवलेली आहेत.

क. या अहवालातील ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रोख ओघ विवरणपत्र हे लेखापुस्तिकानुरूप जुळलेले आहेत.

ड. कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २११ मधील उपकलम (३क) अन्वये अहवालातील ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रोख ओघ विवरणपत्र याबाबतच्या प्रतिकूल मताचा आधार हा क्रमांक ४ च्या अनुषंगाने परिच्छेदात विर्निदिष्ट केले आहे.

इ. कंपनी हे शासकीय महामंडळ असल्यामुळे परिपत्रक क्रमांक जीएसआर ८२९ (इ) दि. २१.१०.२००३ प्रमाणे कंपनी कायदा १९५६ मधील कलम २७४ (१) (ग) मधील तरतूदी कंपनीला ३१ मार्च २०१३ अखेर कालावधीसाठी लागू नाहीत.

ई. कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ४४१ ए अंतर्गत सेसच्या दराबाबत केंद्र सरकारने कुठलीही अधिसूचना काढलेली नाही किंवा तसा नियम किंवा कलम लागू केलेले नाही. त्यामुळे सेस किंवा त्याची थकबाकी भरण्याबाबतचा प्रश्न कंपनीला उद्भवत नाही.

**ओम प्रकाश एस. चपलोत अँड कं.**
**सनदी लेखापाल**
**(संस्था क्रमांक ०००१२७ सी)**

**यश पुंजावत,**
**भागीदार**
**सभासद क्र. ४१५५५२**

स्थळ : मुंबई
दिनांक २७ मे, २०१५

# लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र

**जोडपत्रासाठी आम्ही दिलेला अगोदरचा अहवाल पाहावा.**

i) स्थिर मत्तेबाबत :

अ) कंपनीने स्थिर मत्तेबाबत सर्वसाधारण परिमाणात्मक तपशील व मत्तेची स्थिती यासह संपुर्ण तपशील दर्शविणारा योग्य तो अभिलेख ठेवलेला नाही

ब) आम्हाला स्पष्ट केल्यानुसार व्यवस्थापनाने अहवाल वर्षात मत्तेची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. आणि म्हणून प्रत्यक्ष पडताळणीसाठी आवश्यक असलेल्या तपशीला अभावी प्रत्येक पडताळणीतील विसंगती निश्चित करता येत नाहीत.

क) मिळालेल्या माहितीच्या आधारे, कंपनीने स्थिर मत्ता चालू वर्षात कुठल्याही प्रकारे निकालात पूर्णतः किंवा अंशतः निकालात काढलेली नाही.

ii) साठीणी बाबतीत

अ) आम्हाला स्पष्ट केल्यानुसार व्यवथापनाकडून अहवाल वर्षात तयार मालाच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही

ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार व आमच्या मते महामंडळाचा व्याप व त्याच्या धंद्याचे स्वरुप पाहाता साठ्याच्या प्रत्यक्ष पडताळणी पध्दतीची अंमलबजावणी नियमित अंतराने करणे गरजेचे आहे

क) अहवाल वर्षात महामंडळाने तयार मालाची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही आमच्या मते, वास्तवतेमधील तफावती बाबत प्रत्यक्ष पडताळणी आणि त्याचा लेख्याशी संबध नसल्याने मत व्यक्त करणे शक्य नाही.

iii) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील यादीत दिलेल्या संस्थाना महामंडळाने कोणतीही कर्जे दिलेली नाहीत आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील यादीत नोंद करण्याजोग्या कोणत्याही संस्थेकडून महामंडळाने कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

iv) आमच्या मते माल तयार करण्यासाठी, विक्रीसाठी लागणारी वस्तुसूचिंची खरेदी, उपकरणे व इतर मत्तेसह महामंडळाचा व्याप आणि त्याच्या कार्याचे स्वरुप पाहता अंतर्गत नियंत्रण पध्दती अधिक बळकट करण्याची गरज आहे. लेखापरिक्षण करतेवळी या अंतर्गत नियंत्रण पद्धती तितक्याशा सक्षम नसल्याचे दिसून आले.

v) कंपनीच्या अभिलेख्यांच्या आमच्या तपासणी आधारे आम्ही अशा मताप्रत आहोत की कंपनी अधिनियम च्या कलम ३०१ अन्वये ठेवण्यात येणारी नोंदवही योग्यप्रकारे अद्यावत ठेवलेली नाही. सदर नोंदवहीत व्यवस्थापनाकडून नोंद केला जाणारा संस्था आणि व्यवहाराबाबतचा आवश्यक तपशील लेखापरिक्षणासाठी आवश्यक आहे.

vi) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी भाग ५८ अ, ५८ अअ नुसार व त्या अन्वये तयार केलेल्या नियमानुसार कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्विकारलेल्या नाहीत.

vii) लेखापरिक्षण कालावधीत दिसून आलेल्या तफावतीनुसार सद्याची अंतर्गत लेखापरिक्षण पध्दती ही महामंडळाचा व्याप व धंद्याचे स्वरुप पाहाता सुसंगत नाही. (त्यासाठी सनदी लेखापाल यांची या कार्यासाठी नियुक्ती केली गेली आहे.)

viii) आम्हाला स्पष्टीकरण दिल्यानुसार कंपनी अधिनियम १९५६ मधील भाग २०९, उपभाग (१) चे कलम (ड) अनुसार व्यय अभिलेखे ठेवण्याबाबत केंद्र शासनाने निर्देशित केलेले नाही.

ix) अ)कंपनीच्या अभिलेख्यानुसार कंपनी भविष्य निर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी, कामगार राज्य विमा, आयकर, विक्रीकर, संपत्ती कर, सेवा कर, आयात कर, जकात, सेस यासारखी अविवादीत वैधानिक देणी आणि लागू असलेली इतर वैधानिक देणी नियमितपणे योग्य त्या प्राधिकरणाकडे भरणा केली आहेत.

आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आयकर, विक्रीकर, संपत्ती कर, सेवाकर, आयात कर आणि जकात व सेस यासारख्या अविवादीत रकमा त्या देय झालेल्या तारखेपासून ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरिता थकीत नव्हत्या, असे ३१ मार्च २०१३ च्या लेखापरिक्षाणातील आर्थिक विवरणातून दिसून आले.

ब) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, खालील बाबी वगळता अशी कोणतीही देणी नाहीत. ह्या रकमा ज्या कोणत्याही विवादास्तव भरणा करण्यात आलेल्या नाहीत.

| तपशील | थकबाकी स्वरुप | संबंधित कालावधी | रक्कम | ज्यांच्याकडे प्रलंबित आहे, त्याचा तपशील |
|---|---|---|---|---|
| विक्री कर | विक्री कर मागणी, व्याज व दंड | १९८९-९०<br>१९९९-२०००<br>२००१-०२ | ५,५२,४५४<br>३२,३३,६०८<br>१,१२,०९,८४५ | विक्रीकर उपायुक्त |
| आय कर | आय कर मागणी | १९९२-९३ | १,०७,०६,४०२ | मुंबई उच्च न्यायालय |
| व्हॅट (मूल्यावर्धित कर) | कर, व्याज व दंड | २००५-०६<br>२००८-०९<br>२००९-१०<br>२०१०-११ | १५,४२,६७,७४०<br>४,२०,०७,११९<br>२१,०६,६२,३१०<br>१२,४८,३५,९७३ | विक्रीकर उपायुक्त |

x) आमच्या लेखापरिक्षण कालावधीतील वित्तिय वर्षात अगर त्याच्या मागील वर्षात कंपनीने कोणताही रोख तोटा केलेला नाही. कंपनीला संचित तोटा नाही.

xi) आमच्या लेखापरिक्षण पध्दती आधारे आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आम्ही अशा मताप्रत आहोत की कंपनीने वित्तिय संस्था, बँक किंवा रोखेधारक यांच्या देण्याची परतफेड करण्यात कसूर केलेली नाही.

xii) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि कंपनीने सादर केलेल्या कागदपत्रे व अभिलेख्यानुसार कंपनीने भाग, रोखे, गहाणवट आणि इतर कोणत्याही तारणाआधारे कोणतीही कर्जे वा अग्रिमे दिलेली नाहीत.

xiii) आमच्या मते व आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या कार्याचे स्वरुप हे चिटफंड, निधी, म्युच्यूअल बेनिफीट फंड, सोसायटी यासारखा कोणताही दर्जा आकर्षित करु शकत नाही.

xiv) कपंनीचे अभिलेखे आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी भाग, तारण आणि कर्जरोखे आणि इतर गुंतवणूकीबाबतचे व्यवहार अगर व्यापार करत नाही आणि याबाबतचे नियम ४(१४) कंपनीला लागू होत नाही.

xv) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार बँका व वित्तिय संस्थाकडून इतरांनी घेतलेल्या कर्जाकरिता कंपनीने कोणतीही हमी दिलेली नाही.

xvi) आम्हाला दिलेल्या अभिलेख्याच्या आधारे कंपनीने कोणतेही मुदत कर्ज घेतलेले नाही.

xvii) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि कंपनीच्या ताळेबंदाच्या सर्वसाधारण परिक्षेनंतर कंपनीने अहवाल वर्षात कोणतेही कर्ज घेतलेले नाही आणि म्हणून अल्प, मुदत कर्जाचे दिर्घ मुदत गुंतवणूकीसाठी वा तत्सम इतर कारणासाठी केलेल्या वापराबाबत आमचे भाष्याची जरुरी नाही.

xviii) कंपनीचे अभिलेखे आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ (३) खाली ठेवलेल्या नोंदवहीमध्ये सुचिबध्द केलेल्या कोणत्याही संस्था आणि कंपन्याना कोणतेही अग्रभाग वितरण केलेले नाही.

xix) कंपनीच्या अभिलेख्यानुसार कंपनीने कोणतेही रोखे उभारलेले नाहीत.

xx) अहवाल वर्षात कंपनीने सार्वजनिक भागविक्रीद्वारा कोणताही निधी उभारला नसल्याने आदेशातील कलम (२०) खाली आमच्या भाष्याची जरुरी नाही.

xxi) आम्हाला व्यवस्थापनाने सादर केलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे व आमच्या भरवशानुसार अहवाल वर्षात कंपनीकडून/कंपनीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास किंवा कळविण्यांत आलेले नाही.

**ओम प्रकाश एस. चपलोत अँड कं.**
**सनदी लेखापाल**
**(संस्था क्रमांक ०००१२७ सी)**

**यश पुंजावत,**
**भागीदार**
**सभासद क्र. ४१५५५२**

स्थळ : मुंबई
दिनांक २७ मे, २०१५

## लेखापरिक्षकांच्या भाष्यावर संचालकाचे उत्तर

<table>
<tr><th>क्र</th><th>लेखापरिक्षकांचे भाष्य</th><th>व्यवस्थापनाचे भाष्य</th></tr>
<tr><td>१.<br>i)</td><td>प्रतिकूल परिणामांचा आधार<br>कंपनीच्या व्यापार प्राप्तची येणी ७१,०३,५२,५४६ रुपये आहेत आणि देय व्यापार नावे बाकी रक्कम १५,३६,५४,६६७ आहे व ती तीन वर्षांहून अधिक कालावधीसाठी प्रलंबित आहे. त्याच्या तुलनेत अवघी रु. २,६४,८५,००० एवढीच तरतूद करण्यात आली आहे.</td><td>
<table>
<tr><th>तपशील</th><th>एकूण ऋणको</th><th>ऋणको ३ वर्षांपेक्षा जास्त</th><th>एकूण धनको</th><th>धनको ३वर्षां-पेक्षा जास्त नावे बाकी</th></tr>
<tr><td>विपणन</td><td>११०३९४२०१३</td><td>४२४९०६६३८</td><td>१२२३१३७०१०</td><td>१००९९९०६५</td></tr>
<tr><td>कच्चा माल</td><td>२८५०६०३९१</td><td>२८१५६९५५८</td><td>१४९८२५६४</td><td>४१७२७२७५</td></tr>
<tr><td>इतर (धनको खर्च, वाहतुक, निर्यात,आयात इ. सह)</td><td>३९३८९५३</td><td>३८७६३४९</td><td>५३३०००२१</td><td>१०९२८३२६</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>१३९२९४१३५७</td><td>७१०३५२५४५</td><td>१२९१४१९५९५</td><td>१५३६५४६६७</td></tr>
</table>
<br>विपणन व्यवहारातील सर्व ऋणको हे धनकोंशी संबंधित आहेत. कच्च्या मालाच्या बाबतीत बऱ्याच रकमा या कायदेशीर बार्बीमुळे अडकल्या आहेत. मेटल ट्युबचे ८३७.०५ लाख रु., मेहता ग्रुपचे ५६३.५९ लाख रु., खुटाले स्टीलचे ४७.५२ लाख रुपये अशी या रकमा आहेत. विशेष सुविधा योजनेंतर्गत थकबाकीच्या या रकमा वसूल करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आतापर्यंत ९.७९ लाख रुपयांची वसूली झाली आहे. महामंडळाने कच्च्या मालाच्या व्यवहारातील वसूलीच्या बाबतीत कलम १३८ अन्वये संबंधित प्राधिकरणाकडे प्रकरण दाखल केले आहे. न्यायालयात या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू आहे.<br>महामंडळाने ऋणकोंचा ताळमेळ साधण्याचे काम २००९-१० या वर्षासाठी स्वतंत्र लेखापालांकडून २०.०६.२०१२ पासून सुरू केले आहे. त्यांनी २८.०२.२०१३ रोजी आपला अहवाल सादर केला आहे. मात्र ताळमेळ करण्याबाबत त्यांनी ठोस प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे आतापर्यंत याबाबत कुठलाही निर्णय घेतला गेलेला नाही.<br>२०१३-१४ च्या प्रलंबित अनुशेषाचे काम झाल्यानंतर आम्ही सर्व धनको आणि ऋणको यांच्या पडताळणीचे काम सुरू करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>(ii)</td><td>कंपनीच्या ८०,०७,४२७ रुपयांच्या बराच काळ प्रलंबित असलेल्या ठेवींचा आकडा मुख्यालयाच्या कारभारातला असून त्याच्या वसूलीची किंवा पुढील तीन वर्षांसाठी समायोजन करण्याची कोणतीही योजना नाही. याबाबतची व्यवहारात देखील कुठलाच तपशील आढळून आला नसल्यामुळे ही बाब संशयास्पद वाटते.</td><td>तपशीलाची नोंद घेतली आहे. अनामत ठेवी ५२९६४२७ रु., न्यायालयाकडे २७११००० रु. च्या अनामत ठेवी आहेत. हे प्रकरण अत्यंत जुने आहे. त्याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे त्याची तरतूद केली नाही.<br>२०१३-१४ च्या प्रलंबित अनुशेषाचे काम झाल्यानंतर अनामत ठेवींच्या पडताळणीचे काम सुरू करण्यात येईल.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| (iii) | कंपनीची ८३,१७,५९३ रुपयांची भाडे वसूली बाकी असून त्याला ३ वर्षांहून अधिक काळ होऊनही कुठलीच कारवाई झालेली नाही व तरतूद केलेली नाही. | तक्ता १ (खाली) पाहा.<br>ही लेखा थकबाकी प्रकरणं फार जुनी आहेत. हिंदुस्थान झिंक लि.बद्दल लवादामार्फत प्रक्रिया सुरू असल्यामुळे त्यांची तरतूद लेखावहीत केली नाही.<br>२०१३-१४ च्या प्रलंबित अनुशेषाचे काम झाल्यानंतर याच्या पडताळणीचे काम सुरू करण्यात येईल. |
| (iv) | अन्य अग्रिम रकमांमध्ये इतरही दीर्घकालीन प्रलंबित रकमा असून त्यांचा आकडा ५७,७६,५७८ रुपये इतका होतो. मात्र त्यांच्या वसूलीची किंवा निश्चित समायोजनेचे कुठलेही नियोजन नसल्यामुळे या बाबी संशयास्पद आहेत. कंपनीकडे याबाबतच्या व्यवहाराची कुठलीच सविस्तर माहिती किंवा स्पष्टीकरण मिळालेले नाही. | तक्ता २ (खाली) पाहा.<br>नोंद घेतली आहे. ही खाती खूप जुनी असून त्यांचा तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे लेखावहीत त्यांची तरतूद केली नाही.<br>२०१३-१४ च्या प्रलंबित अनुशेषाचे काम झाल्यानंतर याबाबतच्या पडताळणीचे काम सुरू करण्यात येईल. |
| (v) | अन्य अग्रीम रकमांमध्ये १,३६,०७४ रुपयांचा समावेश असून औरंगाबाद विभागीय कार्यालय व वांद्रे फ्रँकिंग विभागातील फ्रँकिंग मशीनच्या उडीमुळे तोटा असल्याचे जाणवते. गेल्या ३-४ वर्षांपासूनची ही रक्कम असून त्याबाबतच्या वसूलीची कुठलाही माहिती कंपनीने पुरवली नाही. | ३-४ वर्षांपूर्वी मुंबई मुख्यालय व औरंगाबाद येथील फ्रँकिंग मशीन उडाल्याने झालेले नुकसान निश्चित केले आहे. औरंगाबादचे १५१३९ रु. व मुंबईचे १२०९३५ रु. असे मिळून एकूण १३६०७४ रु. नुकसान झाले आहे. |

तक्ता १ — (iii)

| तपशील | खर्च |
|---|---|
| हिंदुस्थान कॉपर लि. | १०३०९४ |
| हिंदुस्थान ऑर्गेनिक | ३९६४२ |
| हिंदुस्थान झिंक लि. | ३५४४९१८ |
| इंडियन ऑईल कॉर्पो. | ४४७९०२९ |
| एम. सी. ई. डी. | ५६२४ |
| पंज लॉईड लि. | २४७७ |
| टेक्सकॉम | १४२८०७ |
| **एकूण** | **८३१७५९३** |

तक्ता २ — (iv)

| तपशील | खर्च |
|---|---|
| बीज भांवडलाची अग्रिमे | ३४०९७५० |
| इंडिया ऑइल कार्प्रो. लि. | ७९५८२१ |
| इंडियन पेट्रोकेमिकल्स कार्पो. लि. | ८९२९८७ |
| आयपीसीएल क्रेडिट | १९०५३९ |
| केरल स्टेट प्रॉडक्ट्स | ४६६७ |
| लेदर इंड. डेव्हल. कार्प्रो.महाराष्ट्र | २१३८६७ |
| नॅशनल क्राफ्ट कॉम्प्लेक्स न्यू दिल्ली | १३९७६९ |
| आयपीसीएल-ठाणे | १२९१७८ |
| **एकूण** | **५७७६५७८** |

(vi)

| तपशील | रक्कम (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| निव्वळ नफा आणि तोटा यांच्या विवरणानुसार झालेला २०१२-१३ वर्षातील निव्वळ नफा वा तोटा | - | ६,३८,१९,४३८ |
| ३ वर्षापेक्षा जास्त व्यापार प्राप्त समायोजन तरतूद प्रलंबित | (६८३८६७५४६) | - |
| ३ वर्षापेक्षा जास्त देय व्यापार नावे बाकी | (१५,३६,५४,६६७) | - |
| ३ वर्षांपेक्षा जास्त ठेवींची तरतूद प्रलंबित | (८,००७,४२७) | - |
| ३ वर्षांपेक्षा जास्त शिल्लक असलेली भाडेवसूली तरतूद प्रलंबित | (८३,१७,५९३) | - |
| ३ वर्षांपेक्षा जास्त शिल्लक असलेली इतर अग्रिमे तरतूद प्रलंबित | (५७,७६,५७८) | - |
| फ्रँकिंग मशीनमुळे झालेले नुकसान तरतूद प्रलंबित | (१३६,०७४) | (८५,९७,५९,८८५) |
| वरील बाबींची पूर्तता झाल्यानंतर होणारा निव्वळ नफा (तोटा) | | (७९,५९,४०,४४७) |

अशाप्रकारे महामंडळाने दाखवल्याप्रमाणे रु. ६.३८ कोटींच्या नफ्याऐवजी प्रत्यक्षात रु. ७९.५९ कोटीचा तोटा झाला आहे.

तपशीलाची नोंद केली आहे. त्याची कारणे वरील (i) ते (v) मधील सदरात दिली गेली आहे.

२. संशयास्पद खात्यांबाबत ६२,०७८.०० (निव्वळ) रुपयांची कर्जे व अग्रीम मध्ये बाकी आहे. ही बाकी कंपनीने रिटर्न बॅक केलेली नाही.

तपशीलाची नोंद केली आहे. ग्वाल्हेरच्या १९९२ च्या व्यापारी पेठेतील रु. ८५,७२८ रकमेच्या चोरीचे प्रकरण, तसेच मुख्य कार्यालयातील रु.२३६५० रुपयांची पत शिलकी रक्कम यांचा ताळमेळ करून ही रक्कम दाखवण्यात आली आहे. हे प्रकरण फार जुने असून त्याबाबतचा ताळमेळ वित्तीय वर्ष २०१३-१४ मध्ये दाखविला जाईल.

३. खर्चाच्या शेष देर्णींचा आकडा ५,५८,५३,८५९ रुपये असून त्यात मुंबई पोर्ट ट्रस्टच्या २,७६,७७,६६७ रुपयांचा समावेश आहे. त्यामुळे ही तपासणी पडताळा व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत. त्याचा कंपनीच्या आर्थिक विवरणपत्रातील नफ्याच्या आकेडवारीवर होणारा परिणाम मांडता येत नाही.

एमबीपीटीचा मुख्य भाग रु. २७६७७६६६ इतका आहे व त्याची मागणी आहे. त्यामुळेच तो भाग एमबीपीटीचे दायित्व या सदरातून वगळण्यात आला नाही. सिडकोसाठी विद्यमान तरतूद रक्कम रु. २७७२३१९७ रु. इतकी करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| ४. | आयसीएआय संस्थेने निश्चित केलेल्या काही लेखांक मानकाचे संपूर्णत: पालन झाल्याचे आढळून आले नाही.<br>i) खरेदी आणि विक्रीबाबत कंपनीकडून पुरवठादारांनी अदा केलेली बिलं आणि एखाद्याच्या मालाचे विक्रेत्याकडून खरेदीदाराला झालेल्या हस्तांतरणानंतर त्याची नोंद घेतली जाते. लेखांचा आधार असलेल्या प्रमाणक ९ नुसार ही प्रक्रिया नाही. त्यामुळे या वर्षी कंपनीच्या वतीने करण्यात आलेल्या व्यवहाराच्या बाबतीत योग्य नसल्याचे दिसून येते. सवलतीच्या उत्पन्नावरील बाबी या विक्रीच्या वेळी नोंद करण्यात आल्या आहेत. वास्तविक लेखा प्रमाणक ९ नुसार हे योग्य नाही. ही सवलत निव्वळ नफा, तोटा तसेच लेखा धोरणातील बदल याबाबतच्या लेखा प्रमाणक ५ अनुसार त्या कार्यकाळातील नफा आणि तोटा यांच्या विवरणात जुळवून घेतली पाहिजे. त्यामुळे वर्षभरातील नफा आणि तोटा दर्शवित असलेल्या आर्थिक ताळेबंदात त्याचे विवरण योग्य प्रकारे आले नाही. कंपनीने लेखा प्रमाणक ९ आणि लेखा प्रमाणक ५ यांचे योग्यरित्या पालन केलेले आढळून आले नाही. | खरेदी आणि विक्रीबाबत कंपनीकडून पुरवठादारांनी अदा केलेली बिलं मिळाल्यानंतरच त्याची खरेदी लेखा नोंद करण्याची पद्धत अनेक वर्षांपासूनची आहे.<br>त्याशिवाय महामंडळ हे लघुउद्योग संस्था म्हणून नोंदणीकृत असलेल्या आस्थापनांकडूनच मालाची खरेदी करते. यामुळे त्यांच्या विक्रीच्या नोंदीचा ताळमेळ करून घेण्याची पद्धतदेखील गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे.<br>वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये दिलेली ऑर्डर पूर्ण करण्याची प्रक्रिया मार्च महिन्यात सुरू झाली. ही प्रक्रिया ३१ मार्चपर्यंत पूर्ण व्हायला हवी होती. मात्र पुरवठादाराने त्यातला काही भाग चालू आर्थिक वर्षात पूर्ण केला तर उरलेला नंतर आर्थिक वर्षात तो पूर्ण झाला. मात्र, मालाचे वितरण केल्याच्या चलनावर मार्च महिन्याची तारीख त्या आर्थिक वर्षात लिहली गेली होती. महामंडळच्या पद्धतीनुसार ही ऑर्डर एप्रिल ते मे महिन्यात पूर्ण केल्यानंतर त्यांनी त्याचे बिल सादर केले. हा संपूर्ण कालावधी मार्च-एप्रिल-मे असा राहिला. त्यामुळे मालाच्या खरेदी-विक्रीचे बुकिंग हे २०१२-१३ या वर्षात झाल्याची नोंद दोघांकडूनही केली गेली.<br>ही पद्धती महामंडळाने अनेक व्यवहाराच्या बाबतीत पाळली आहे. त्यापैकी अनेक पुरवठादारांनी मार्च महिन्यातच त्यांचा पुरवठा केला असून तो ३१ मार्चच्या अगोदरच पूर्ण केला आहे. |
| | ii) स्थिर मत्तेची प्रत्यक्ष पडताळणी किंवा अन्य पद्धती मालमत्ता बदलातील लेखा प्रमाणक २८ अनुसार पाळल्या गेल्या नाहीत. वसूली करण्यात येणाऱ्या रकमेशिवाय अन्य वसूली न करण्याबाबतचे हे संकेत आहेत.<br>ज्याअर्थी स्थिर मत्तेची प्रत्यक्ष पडताळणी न झाल्यामुळे कंपनीला आपल्या आर्थिक विवरणात याबाबतचे खात्रीलायक स्पष्टीकरण देता आले नाही. यानुसार या मत्तेची विल्हेवाट लावल्यानंतर त्यातून मिळालेले फायदे, त्याचा पुढील उपयोग, त्यातून होणारे नुकसान आदी बाबी नफा आणि तोटा दर्शविणाऱ्या आर्थिक विवरणात असणे आवश्यक आहे. त्यामुळे स्थिर मत्तेच्या लेखांबाबत असलेले लेखा प्रमाणक १० याचे पालन झालेले नाही. | मालमत्तेची नोंदवही महामंडळाने ठेवली आहे. मात्र खालील कारणास्तव त्यात वस्तुनिहाय नोंद करणे सध्या शक्य झाले नाही.<br>१. सुविधा पुरवणे हा महामंडळाचा गुणविशेष आहे.<br>२. ही मालमत्ता वेगवेगळ्या (विभाग किंवा जिल्हा) भागात विखुरलेली असते.<br>३. प्रत्येक ठिकाणी याबाबतची नोंद व्यवस्थिपणे केलेली असते. त्यात तारीख निहाय तसेच त्यातील अद्ययावतपणाप्रमाणे ही नोंद आढळून येते. मात्र त्याचा तपशील तातडीने उपलब्ध होत नाही.<br>४. महामंडळाने या कामासाठी स्वंतत्र लेखापाल संस्थेला २००९-१० या सालाकरिता २०.०६.२०१२ पासून नियुक्त केले आहे. त्यांनी २८.०२.२०१३ रोजी अहवाल सादर केला आहे. हा अहवालाला अद्याप अंतिम मंजूरी दिली गेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| | iii) आयआयटीएफ २०१२ च्या संदर्भातील लेखा प्रमाणपत्रानुसार, खर्च वगळता मिळालेले उत्पन्न २०,३२,७२५ रुपये इतके होते. मात्र, लेखा नोंदीनुसार ही रक्कम २६,०३,४३६ रुपये इतकी असल्याचे दिसून येते. या फरकाचा अद्याप ताळमेळ लागत नाही. त्यामुळे कंपनीने शासकीय अनुदानाबाबतच्या लेखा प्रमाणक - १२ चे पालन | नोंद घेतली आहे. जास्तीचा आलेला खर्च सन २०१३-१४ मध्ये नफा-तोटा पत्रकात नावे टाकण्यात येईल. |
| | iv) कामगारांच्या लाभांसाठी असलेल्या लेखा प्रमाणक १५, विभागीय अहवालाचे लेखा प्रमाणक - १७, संबंधित संस्थांच्या माहिती जाहीर करण्याबाबतचे लेखा प्रमाणक - १८ तसेच लीजबद्दलचे लेखा प्रमाणक - १९ यांचे तपशील कंपनीने उघडकीस आणलेले नाहीत. | नोंद घेतली आहे. एलआयसीबाबत योग्य लेखा नोंदी करण्यात आलेल्या आहेत. विभागीय अहवालाबाबत तसेच अन्य संस्थांच्या माहितीबाबत ती जाहीर करण्याची पद्धत पाळली जाते. लिजची माहिती गेल्या अनेक वर्षांपासून उपलब्ध नाही. कारण ही सर्व मालमत्ता शासनाकडून लीजवर घेण्यात आलेली आहे. |
| ५. | प्रलंबित विक्रीकर, सेवा कर, कामकाज करार कर व इतर कायदेशीर प्रकरणं व त्यांच्यावरील दायित्व याबाबतची माहिती सविस्तरपणे दिली गेली नाही. त्यामुळे अनेक वर्षे अपिलीय प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या या प्रकरणांबाबतची विद्यमान स्थिती समजून येत नाही. त्यामुळे त्याचा योग्य ताळमेळ घालता येत नाही. | तपशीलाची नोंद घेतली आहे. |
| ६. | खालील शीर्षकाखाली असलेल्या शिल्लका या तपासणी पडताळा व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत. (तक्ता खाली) | तपशीलाची नोंद घेतली आहे. हे लेखा प्रकरण अत्यंत जुने असून त्याची योग्य माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांची योग्य पडताळणी व ताळमेळ करणे अवघड आहे.<br>२०१३-१४ च्या प्रलंबित अनुशेषाचे काम झाल्यानंतर याचे काम सुरू करण्यात येईल. |

| शीर्षक | रक्कम (रु.) |
|---|---|
| खर्चाकरिता दायित्वे | ५,५८,५३,८५९ |
| व्यापार प्राप्त | १२९,१४,१९,५९६ |
| कर्मचाऱ्यांची देणी | ९,१३,८५३ |
| बाहेरील संस्थांची देणी | ७३,०४,९३,८८९ |
| सेवा कर | १,०७,४८,३७८ |
| मिळालेल्या ठेवी | १६,४१,१८,८५३ |
| अग्रिम कर व मूळात कापलेला कर | १२,७३,४१,२४२ |
| केंद्रीय विक्रीकर | ७,९६,१९४ |
| महाराष्ट्र विक्रीकर व मूल्यावर्धित कर | १६,२९,४१६ |
| पुरवठाधारकांना अग्रिमे | ५,९५,००० |
| सुरक्षा रक्कम | ९६,६१,७४८ |
| देय व्यापार | १३९,२९,४१,३५८ |

| | | |
|---|---|---|
| ७. | खालील कर्जाच्या बाबतीत मुद्दल रकमेपेक्षा व्याज रक्कम जास्त आहे. त्यामुळे खालील अप्रतिभूत कर्जावर देय असलेल्या व्याजाची सन २००७-०८ करिता लेख्यात तरतूद करण्यात आलेली नाही.<br><br>लेख्यांचे नाव — अदत्त रक्कम (रुपयांत)<br>उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन सुशिक्षित बेरोजगार कर्ज योजना — ४०,९२,४०८<br>उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन बीज भांडवल योजना (३.५ टक्के) — १,५४,५२,६३० | हे प्रकरण १९८३-८४ पूर्वीचे आहे. त्याचा ताळमेळ गेल्या अनेक वर्षांपासून केला गेला नाही. शासनानेही याबाबत मुद्दल व व्याज याची विचारणा केली नाही. त्यामुळे २००७-०८ पासून या खात्यावरील व्याजाची नोंद लेखा वहीत करण्यात आलेली नाही.<br>व्याजावरील रकमेचा ताळमेळ हा २०१३-१४ च्या प्रलंबित अनुशेषाचे काम झाल्यानंतर सुरू करण्यात येईल. |
| ८. | कंपनीचा व्याप आणि धंद्याचा आवाका पाहता कंपनीची अतंर्गत नियंत्रण प्रणाली फार दुर्बल आहे आणि तद्अनुषंगाने लबाडी, नुकसान लपवणे, अफरातफर इत्यादींसाठी विविध पातळींवर ही पद्धती संवेदनक्षम आहे. | लेखा कार्यासाठी उपयोगात असलेले Tally सॉफ्टवेअर पूर्णतः सुरक्षित नाही. त्यासाठी स्वतंत्र एकात्मिक लेखा सॉफ्टवेअर असायला हवे. कामाचा अनुशेष अधिक असल्यामुळे अंतर्गत लेखापरिक्षणाला विलंब झाला. त्यासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांना सर्व व्यवहारांची पडताळणी योग्य प्रकारे करून घेण्यासाठी विनंती केली आहे. त्यामुळे लवकरच आम्ही आपली लेखा पद्धती अधिक सक्षम करू तसेच शिल्लक कामांचा अनुशेष भरून काढू. |
| ९. | लेखापरिक्षण करतेवेळी ३१ मार्च २०१३ पर्यंतच्या मुदत ठेवीच्या मूळ पावत्या सादर करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे त्या कालावधीत ज्या ठेवींची मुदत संपली नाही, त्याचा तपशील देता आला नाही. | महामंडळाने ९९९५३६२६१ रु. इतक्या रकमा मुदत ठेवींत ठेवल्या आहेत. या वर्षात त्यांची मुदत संपल्यामुळे ती रोखीत बदलून घेतली. त्यामुळे त्याच्या झेरॉक्स प्रती वित्त विभागाने दिल्या आहेत. त्याच्या आधारे मिळालेले व संचित व्याज यांचा तपशील योग्यरित्या ठेवण्यात आला आहे. |
| १०. | तपशील पुरविण्यात न आल्यामुळे याबाबतच्या रकमा तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनी त्याच्यावरील भरलेल्या व्याजाच्या रकमाबाबत मतं प्रदर्शित करता आले नाही. | नोंद घेतली आहे. |
| ११. | मुख्य गोदाम आणि कार्यालय भाडे याबाबतच्या रकमाचा ताळमेळ केला गेला नाही. त्यामुळे त्याच्यावरील मत लेखा पुस्तिकेत नोंदविता आले नाही. | गोदाम आणि कार्यालयाच्या भाड्यापोटी मिळणारी रक्कम १८८२१९४२ रु. इतकी आहे. महामडळाने उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे गोदामाच्या उतपन्नाचा आकडा निश्चित केला आहे. |
| १२. | कंपनी कायद्यातील खालील तरतूदींचे पालन करण्यात आले नाही.<br>i) कलम ३८३ अ अन्वये कंपनीच्या सेवेत पूर्णवेळ कंपनी सचिव नियुक्ती १० सप्टेंबर २०१२ पर्यंत करण्यात आली नसल्याचे आढळून आले.<br>ii) चालू वर्षात लेखापरिक्षण समितीची बैठक झालेली नाही. | नोंद घेतली आहे.<br><br>२१.०८.२०१२ रोजी मंडळाच्या झालेल्या ३२६ व्या बैठकीत लेखापरिक्षण समितीची नियुक्ती केली आहे. नोंदवही ठेवण्यात आली असून ती अद्ययावतदेखील केली जाते. |

**लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र**

जोडपत्रासाठी आम्ही दिलेला अगोदरचा अहवाल पाहावा

| | | |
|---|---|---|
| i) | स्थिर मत्तेबाबत : | |
| | अ) कंपनीने स्थिर मत्तेबाबत सर्वसाधारण परिमाणात्मक तपशील व मत्तेची स्थिती यासह संपुर्ण तपशील दर्शविणारा योग्य तो अभिलेख ठेवलेला नाही | महामंडळ आपल्या विविध ठिकाणी स्थिर मत्तेची नोंदवही ठेवते. त्याचबरोबर दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागांना नोंदवही ठेवण्यास तसेच ती अद्ययावत करण्यास सांगितले गेले आहे. |
| | ब) आम्हाला स्पष्ट केल्यानुसार व्यवस्थापनाने अहवाल वर्षात मत्तेची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. आणि म्हणून प्रत्यक्ष पडताळणीसाठी आवश्यक असलेल्या तपशीला अभावी प्रत्येक पडताळणीतील विसंगती निश्चित करता येत नाहीत. | नोंद घेतली आहे. त्यानुसार मार्च २०१५ पासून त्याची अंमलबजावणी केली जाईल. त्याचबरोबर दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागांना नोंदवही ठेवण्यास तसेच ती अद्ययावत करण्यास सांगितले गेले आहे. |
| | क) मिळालेल्या माहितीच्या आधारे, कंपनीने स्थिर मत्ता चालू वर्षात कुठल्याही प्रकारे निकालात पूर्णतः किंवा अंशतः निकालात काढलेली नाही. | नोंद घेतली आहे. . |
| ii) | साठीणी बाबतीत, अ) आम्हाला स्पष्ट केल्यानुसार व्यवथापनाकडून अहवाल वर्षात तयार मालाच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही | नोंद घेतली आहे. त्यानुसार मार्च २०१५ पासून त्याची अंमलबजावणी केली जाईल. त्याचबरोबर दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागांना नोंदवही ठेवण्यास तसेच ती अद्ययावत करण्यास सांगितले गेले आहे. |
| | ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार व आमच्या मते महामंडळाचा व्याप व त्याच्या धंद्याचे स्वरुप पाहाता साठ्याच्या प्रत्यक्ष पडताळणी पध्दतीची अंमलबजावणी नियमित अंतराने करणे गरजेचे आहे | नोंद घेतली आहे. त्यानुसार मार्च २०१५ पासून त्याची अंमलबजावणी केली जाईल. त्याचबरोबर दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागांना नोंदवही ठेवण्यास तसेच ती अद्ययावत करण्यास सांगितले गेले आहे. |
| | क) अहवाल वर्षात महामंडळाने तयार मालाची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही आमच्या मते, वास्तवतेमधील तफावती बाबत प्रत्यक्ष पडताळणी आणि त्याचा लेख्याशी संबध नसल्याने मत व्यक्त करणे शक्य नाही. | नोंद घेतली आहे. त्यानुसार मार्च २०१५ पासून त्याची अंमलबजावणी केली जाईल. त्याचबरोबर दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागांना नोंदवही ठेवण्यास तसेच ती अद्ययावत करण्यास सांगितले गेले आहे. |
| iii) | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील यादीत दिलेल्या संस्थाना महामंडळाने कोणतीही कर्जे दिलेली नाही आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील यादीत नोंद करण्याजोग्या कोणत्याही संस्थेकडून महामंडळाने कोणतेही कर्ज घेतलेले नाही. | नोंद घेतली आहे. |

| | | |
|---|---|---|
| iv) | आमच्या मते माल तयार करण्यासाठी, विक्रीसाठी लागणारी वस्तुसूचिंची खरेदी, उपकरणे व इतर मत्तेसह महामंडळाचा व्याप आणि त्याच्या कार्याचे स्वरुप पाहता अंतर्गत नियंत्रण पध्दती अधिक बळकट करण्याची गरज आहे. लेखापरिक्षण करतेवळी या अंतर्गत नियंत्रण पद्धती तितक्याशा सक्षम नसल्याचे दिसून आले. | नोंद घेतली आहे.<br>पद्धती बळकट करण्याचा आम्ही प्रयत्न करू. |
| v) | कंपनीच्या अभिलेख्यांच्या आमच्या तपासणी आधारे आम्ही अशा मताप्रत आहोत की कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अन्वये ठेवण्यात येणारी नोंदवही योग्यप्रकारे अद्यावत ठेवलेली नाही. सदर नोंदवहीत व्यवस्थापनाकडून नोंद केला जाणारा संस्था आणि व्यवहाराबाबतचा आवश्यक तपशील लेखापरिक्षणासाठी आवश्यक आहे. | नोंद घेतली आहे. |
| vi) | आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी भाग ५८ अ, ५८ अअ नुसार व त्या अन्वये तयार केलेल्या नियमानुसार कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्विकारलेल्या नाहीत. | नोंद घेतली आहे. |
| vii) | लेखापरिक्षण कालावधीत दिसून आलेल्या तफावतीनुसार सद्याची अंतर्गत लेखापरिक्षण पध्दती ही महामंडळाचा व्याप व धंद्याचे स्वरुप पाहाता सुसंगत नाही. (त्यासाठी सनदी लेखापाल यांची या कार्यासाठी नियुक्ती केली गेली आहे.) | महामंडळाने अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक केली आहे. त्यांनी आपला अहवाल व्यवस्थापनाला सादर केला आहे. २०१३-१४ या वर्षीचे अंतर्गत लेखापरिक्षण प्रगतीपथावर आहे. अंतर्गत नियंत्रण प्रणाली सक्षम व मजबूत करण्यासाठी त्यानुसार कार्यप्रणाली निश्चित करण्यासाठी आम्ही अंतर्गत लेखापरिक्षकाला आपला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. |
| viii) | आम्हाला स्पष्टीकरण दिल्यानुसार कंपनी अधिनियम १९५६ मधील भाग २०९, उपभाग (१) चे कलम (ड) अनुसार व्यय अभिलेखे ठेवण्याबाबत केंद्र शासनाने निर्देशित केलेले नाही. | नोंद घेतली आहे. |
| ix) | कंपनीच्या अभिलेख्यानुसार<br>अ) कंपनी भविष्य निर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी, कामगार राज्य विमा, आयकर, विक्रीकर, संपत्ती कर, सेवा कर, आयात कर, जकात, सेस यासारखी अविवादीत वैधानिक देणी आणि लागू असलेली इतर वैधानिक देणी नियमितपणे योग्य त्या प्राधिकरणाकडे भरणा केली आहेत.<br>आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आयकर, विक्रीकर, संपत्ती कर, सेवाकर, आयात कर आणि जकात व सेस यासारख्या अविवादीत रकमा त्या देय झालेल्या तारखेपासून ६ महिन्यापेक्षा | नोंद घेतली आहे. |

<table>
<tr><td></td><td>जास्त कालावधीकरिता थकीत नव्हत्या, असे ३१ मार्च २०१३ च्या लेखापरिक्षाणातील आर्थिक विवरणातून दिसून आले.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>ब) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, खालील बाबी वगळता अशी कोणतीही देणी नाहीत. ह्या रकमा ज्या कोणत्याही विवादास्तव भरणा करण्यात आलेल्या नाहीत.
<table>
<tr><th>तपशील</th><th>थकबाकी स्वरुप</th><th>संबंधित कालावधी</th><th>रक्कम</th><th>ज्यांच्याकडे प्रलंबित आहे, त्याचा तपशील</th></tr>
<tr><td>विक्री कर</td><td>विक्री कर मागणी, व्याज व दंड</td><td>१९८९-९०<br>१९९९-२०००<br>२००१-०२</td><td>५,५२,४५४<br>३२,३३,६०८<br>१,१२,०९,८४५</td><td>विक्रीकर उपायुक्त</td></tr>
<tr><td>आय कर</td><td>आय कर मागणी</td><td>१९९२-९३</td><td>१,०७,०६,४०२</td><td>मुंबई उच्च न्यायालय</td></tr>
<tr><td>व्हॅट</td><td>कर, व्याज व दंड</td><td>२००५-०६<br>२००८-०९<br>२००९-१०<br>२०१०-११</td><td>१५,४२,६७,७४०<br>४,२०,०७,११९<br>२१,०६,६२,३१०<br>१२,४८,३५,९७३</td><td>विक्रीकर उपायुक्त</td></tr>
</table></td><td>विक्रीकर, आयकर व मूल्यवर्धित करासंबंधी प्रकरणांचा पाठपुरावा महामंडळाच्या वतीने संबंधित प्राधिकरणाकडे करण्यात येत असून लवकरच अंतिम निर्णय अपेक्षित आहे.</td></tr>
<tr><td>x)</td><td>आमच्या लेखापरिक्षण कालावधीतील वित्तीय वर्षात अगर त्याच्या मागील वर्षात कंपनीने कोणताही रोख तोटा केलेला नाही. कंपनीला संचित तोटा नाही.</td><td>नोंद घेतली आहे.</td></tr>
<tr><td>xi)</td><td>आमच्या लेखापरिक्षण पध्दती आधारे आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आम्ही अशा मताप्रत आहोत की कंपनीने वित्तिय संस्था, बँक किंवा रोखेधारक यांच्या देण्याची परतफेड करण्यात कसूर केलेली नाही.</td><td>नोंद घेतली आहे.</td></tr>
<tr><td>xii)</td><td>आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि कंपनीने सादर केलेल्या कागदपत्रे व अभिलेख्यानुसार कंपनीने भाग, रोखे, गहाणवट आणि इतर कोणत्याही तारणाआधारे कोणतीही कर्जे वा अग्रिमे दिलेली नाहीत.</td><td>नोंद घेतली आहे.</td></tr>
<tr><td>xiii)</td><td>आमच्या मते व आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या कार्याचे स्वरुप हे चिटफंड, निधी, म्युच्यूअल बेनिफीट फंड, सोसायटी यासारखा कोणताही दर्जा आकर्षित करु शकत नाही.</td><td>नोंद घेतली आहे.</td></tr>
<tr><td>xiv)</td><td>कपंनीचे अभिलेखे आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी भाग, तारण आणि कर्जरोखे आणि इतर गुंतवणूकीबाबतचे व्यवहार अगर व्यापार करत नाही आणि याबाबतचे नियम ४(१४) कंपनीला लागू होत नाही.</td><td>नोंद घेतली आहे.</td></tr>
<tr><td>xv)</td><td>आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार बँका व वित्तिय संस्थाकडून इतरांनी घेतलेल्या कर्जाकरिता कंपनीने कोणतीही हमी दिलेली नाही.</td><td>नोंद घेतली आहे.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| xvi) | आम्हाला दिलेल्या अभिलेख्याच्या आधारे कंपनीने कोणतेही मुदत कर्ज घेतलेले नाही. | नोंद घेतली आहे. |
| xvii) | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि कंपनीच्या ताळेबंदाच्या सर्वसाधारण परिक्षेनंतर कंपनीने अहवाल वर्षात कोणतेही कर्ज घेतलेले नाही आणि म्हणून अल्प, मुदत कर्जाचे दिर्घ मुदत गुंतवणूकीसाठी वा तत्सम इतर कारणासाठी केलेल्या वापराबाबत आमचे भाष्याची जरुरी नाही. | नोंद घेतली आहे. |
| xviii) | कंपनीचे अभिलेखे आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ (३) खाली ठेवलेल्या नोंदवहीमध्ये सुचिबध्द केलेल्या कोणत्याही संस्था आणि कंपन्याना कोणतेही अग्रभाग वितरण केलेले नाही. | नोंद घेतली आहे. |
| xix) | कंपनीच्या अभिलेख्यानुसार कंपनीने कोणतेही रोखे उभारलेले नाहीत. | नोंद घेतली आहे. |
| xx) | अहवाल वर्षात कंपनीने सार्वजनिक भागविक्रीद्वारा कोणताही निधी उभारला नसल्याने आदेशातील कलम (२०) खाली आमच्या भाष्याची जरुरी नाही. | नोंद घेतली आहे. |
| xxi) | आम्हाला व्यवस्थापनाने सादर केलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे व आमच्या भरवशानुसार अहवाल वर्षात कंपनीकडून/कंपनीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास किंवा कळविण्यांत आलेले नाही. | नोंद घेतली आहे. |

सत्यमेव जयते

प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा)-III महाराष्ट्र
प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०००२०
**OFFICE OF THE PRINCIPAL ACCOUNTANT GENERAL (AUDIT)-III, MAHARASHTRA**
**Pratistha Bhavan, 101, Maharshi Karve Marg, Mumbai - 400020**

गोपनीय

तारीख १३ ऑक्टोबर २०१५

पीएजी/लेप-III/वालेप खंड - I/ स्मॉल स्केल/2012-13/536

**सेवा में,**
**प्रबंध निदेशक,**
**महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,**
**मुंबई.**

**विषय : मार्च 31, 2013, को समाप्त हुए वर्ष के महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई के लेखों पर कंपनी अधिनियम, 1956 की धारा 619 (4) के अंतर्गत भारत के नियंत्रक - महालेखापरिक्षक की टिप्पणियाँ।**

महोदय,

मार्च 31, 2013 को समाप्त हुए वर्ष के महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई के लेखों पर कंपनी अधिनियम, 1956 की धारा 619 (4) के अंतर्गत भारत के नियंत्रक - महालेखापरिक्षक की टिप्पणी (Comments)संलग्न हैं।

वार्षिक आमसभा (A.G.M)होने के पश्चात, वार्षिक रिपोर्ट की पांच मुद्रित प्रतियाँ कृपया इस कार्यालय को भेज दें।

भवदीया,
*संगीता चौरे*
प्रधान महालेखाकार
लेखापरीक्षा -III

संलग्न : यथोपरि

Tel : 022-2205 4022/ 2205 7360/ 2201 4437 Fax : 2209 2326/2201 4438
Email : agcommauMaharashtra@cag.gov.in

**कंपनी अधिनियम १९५६ चा भाग ६१९ (४) खाली महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबईच्या दि. ३१/०३/२०१३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य**

कंपनी अधिनियम १९५६ मध्ये निर्देशित केलेल्या वित्तिय सादरीकरण चौकटीनुसार दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई ची वित्तिय पत्रके तयार करण्याची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (२) अनुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी नियुक्त केलेले वैधानिक लेखापरिक्षक कंपनी अधिनियम १९५६ मधील भाग २२७ अन्वये इन्स्टीट्यूट ऑफ चार्टड अकाऊंटंट ऑफ इंडिया या व्यावसायिक संस्थेने निर्देशित केलेल्या लेखापरिक्षण व खातरजमा प्रमाणकानुसार स्वतंत्र लेखापरिक्षणाआधारे या वित्तिय पत्रकावर भाष्य करण्यास जबाबदार आहेत. दर्शविल्यानुसार हे काम त्यांचा लेखापरिक्षण अहवाल दि. २७ मे २०१५ द्वारा करण्यात आले आहे.

मी, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या वत्तीने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(३)(ब) अनुसार **महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई** यांच्या दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या वित्तिय पत्रकांचे पुरवणी लेखापरिक्षण केले. सदर पुरवणी लेखापरिक्षण वैधानिक लेखापरिक्षकांचे कोणतेही कागदपत्र न पाहता व प्राथमिक स्वरुपात वैधानिक लेखापरिक्षकांशी व कंपनी अधिकाऱ्यांशी मर्यादित विचारणा करुन तसेच काही निवडक लेखा अभिलेख्यांची तपासणी करुन स्वतंत्रपणे पार पा डण्यात आले. माझ्या पुरवणी लेखापरिक्षणाच्या आधारे कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (४) अनुसार महत्वाच्या बाबी माझ्या निदर्शनास आल्या नाहीत की ज्या लेखापरिक्षणावर किंवा वैधानिक लेखापरिक्षकांच्या पुरवणी अहवालावर भाष्य करण्यास उद्युक्त करतील.

## आर्थिक विवरणावरील टिपण्या

**नफा-तोटा पत्रकाचे भाष्य**

**इतर उत्पन्न (टीप १८ ) रु. १४.५७ कोटी**

**प्राप्त भाडे रु. ५.२० कोटी**

१. केंद्रीय गोदाम महामंडळाच्या वतीने मार्च २०११ ते मार्च २०१३ या कालावधीत आकारण्यात आलेल्या ४५.३९ लाख रुपयांच्या भाडे बिलाचा समावेश आहे. याबाबत उभयतांमध्ये कुठलाही करार आढळला नसून भाडेपट्टा लांबवण्याबाबत महामंडळाने केलेली मागणी याबाबत वाद आहे. लेखाप्रमाणक ९ च्या महसूलविषयक परिच्छेद १० नुसार ज्यावेळी अशाप्रकारे करण्यात आलेला दावा ज्यावेळी निर्माण होईल, तेव्हापासूनच्या महसूलविषयक बाबी हा प्रलंबित ठेवण्यात याव्यात.

त्यामुळे भाडेविषयक विवादाविषयीची लेखा नोंद ही ताळेबादात दाखविण्यात आल्यामुळे वर्षातील नफा १६.५१ लाख रुपये इतका दर्शविण्यात आला आहे. गेल्यावर्षी मार्च २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील ही रक्कम २८.८८ लाख रुपये इतकी होती. चालू मत्ता ४५.३९ लाख रुपये इतकी आहे.

**इतर उत्पन्न (टीप २३) रु. ५.२६ कोटी**

**दर आणि कर : रु. ०.६२ कोटी**

२.गोदामाचे भाडे हे भाडे या शीर्षकाखाली ५२.७४ लाख रुपये इतके दाखविण्यात आले आहे. त्यामुळेच दर आणि कर या शीर्षकाखाली नोंदीमध्ये भाडे ५२.७४ लाख रुपये इतके समाविष्ट केले आहे.

**इतर उत्पन्न (टीप २३)**

**दुरूस्ती, देखभाल आणि बदल**

**इतर - रु. १६.१२ कोटी**

३. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे १४ एप्रिल २०१२ रोजी कंपनीच्या इमारतीचा, बांधकामाचा तसेच अन्य सोपस्कारांबाबतचा आराखडा सादर करण्याच्या वेळेची मर्यादा वाढवून मिळण्यासाठी १९ सप्टेंबर १९९८ ते ३१ मार्च २०१२ या कालावधीसाठी बिना परत न मिळण्याच्या तत्त्वावर ४१.१५ लाख रुपयांच्या अतिरिक्त अधिमूल्य रकमेचा यात समावेश आहे. हा खर्च त्यामुळेच स्थायी मता - जमिनीचे लीज भांडवल या सदराखाली वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळेच नफा आणि स्थायी मत्ता या नोंदीत ४१.१५ लाख रुपयांचा समावेश आढळून येतो.

**टिपण्या उघडकरचे भाष्य**

**खाते टीप**

४. अहमदनगर आणि कोल्हापूर येथील गोदामांच्या लीजबाबतचे दोन्ही कंपन्यांमध्ये करार करण्यात आला आहे. हे भाडे अनुक्रमे सप्टेंबर २००९ ते ऑक्टोबर २००९ या कालावधीपासून लागू करण्यात आले आहे. कंपनीने जुलै २०१० ते मे २०११ या कालावधीसाठी अहमदनगर व कोल्हापूर येथील गोदामासाठी डिसेंबर २०१० ते मे २०११ या कालावधीसाठी देयक दिलेले नाही.

त्यामुळेच दोन्ही कंपन्यांकडून ७७.०६ लाख रुपयांचे भाडे वसूल करणे बाकी आहे. याबाबतची नोंद टिपण्णी मध्ये घेण्यात यावी.

**महत्त्वपूर्ण लेखा धोरणे**

५. महामंडळाला जागतिक व्यापार केंद्रातील जागा ६० वर्षांच्या लीजवर घेण्यासाठी २५.४० लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. याचा ६० वर्षांसाठी प्रतिलेखित करावयाचा आहे, तेव्हापासून दरवर्षी अनुदानातील ०.४२ लाख रुपयांची रक्कम ही अन्य उत्पन्न या सदराखाली दाखविण्यात येते. महत्त्वपूर्ण लेखा धोरणातील शासकीय अनुदानाबाबतच्या लेखा मानक १२ नुसार शासकीय अनुदानाची रक्कम तसेच घसारा याबाबतचा ताळमेळ वित्तीय विवरणातील स्थायी मत्तेच्या सदरात निर्देशित करण्यात येतो.

**इतर भाष्य**

६. दरवर्षी होणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठी कुठलीही ठोस प्रणाली कंपनीकडे नाही. त्यामुळे खर्च व त्याची तरतूद त्या-त्या वर्षी करण्यात येते. त्यामुळे कंपनीच्या वित्तीय निकालांवर त्याचे काहीवेळी विपरित परिणाम दिसून येतात.

**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक**

**यांच्याकरिता व च्यावतीने**

*संगीता चौरे*

**महालेखापरिक्षक**
**(लेखापरिक्षा -III)**

दिनांक :
स्थळ :

**कंपनी अधिनियम १९५६ चा भाग ६१९ (४) खाली महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबईच्या दि. ३१/०३/२०१३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या भाष्यावर दिलेले उत्तर**

| क्र. भाष्य | मंडळाचे उत्तर |
|---|---|
| **नफा-तोटा पत्रकाचे भाष्य**<br>**इतर उत्पन्न (टीप १८ ) रु. १४.५७ कोटी**<br>**प्राप्त भाडे रु. ५.२० कोटी**<br>**१.** केंद्रीय गोदाम महामंडळाच्या वतीने मार्च २०११ ते मार्च २०१३ या कालावधीत आकारण्यात आलेल्या ४५.३९ लाख रुपयांच्या भाडे बिलाचा समावेश आहे. याबाबत उभयतांमध्ये कुठलाही करार आढळला नसून भाडेपट्टा लांबवण्याबाबत महामंडळाने केलेली मागणी याबाबत वाद आहे. लेखाप्रमाणक ९ च्या महसूलविषयक परिच्छेद १० नुसार ज्यावेळी अशाप्रकारे करण्यात आलेला दावा ज्यावेळी निर्माण होईल, तेव्हापासूनच्या महसूलविषयक बाबी हा प्रलंबित ठेवण्यात याव्यात.<br>त्यामुळे भाडेविषयक विवादाविषयीची लेखा नोंद ही ताळेबादात दाखविण्यात आल्यामुळे वर्षातील नफा १६.५१ लाख रुपये इतका दर्शविण्यात आला आहे. गेल्यावर्षी मार्च २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील ही रक्कम २८.८८ लाख रुपये इतकी होती. चालू मत्ता ४५.३९ लाख रुपये इतकी आहे. | नोंद घेतली आहे. महामंडळाने या वसूलीसाठी अनेक स्मरणपत्रं पाठविली आहेत. वसूलीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. वित्तीय वर्ष २०१३-१४ मधील लेख्यांच्या टिपण्णीत नोंद घेण्यात येईल. |
| **इतर उत्पन्न (टीप २३) रु. ५.२६ कोटी**<br>**दर आणि कर : रु. ०.६२ कोटी**<br>**२.**गोदामाचे भाडे हे भाडे या शीर्षकाखाली ५२.७४ लाख रुपये इतके दाखविण्यात आले आहे. त्यामुळेच दर आणि कर या शीर्षकाखाली नोंदीमध्ये भाडे ५२.७४ लाख रुपये इतके समाविष्ट केले आहे. | नोंद घेतली आहे. त्यानुसार कार्यालयीन भाड्याचे वर्गीकरण होत असून त्याची योग्य नोंद २०१३-१४ या वित्तीय वर्षातील लेखा अहवालात करण्यात येईल. |
| **इतर उत्पन्न (टीप २३)**<br>**दुरुस्ती, देखभाल आणि बदल**<br>**इतर - रु. १६.१२ कोटी**<br>**३.** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे १४ एप्रिल २०१२ रोजी कंपनीच्या इमारतीचा, बांधकामाचा तसेच अन्य सोपस्कारांबाबतचा आराखडा सादर करण्याच्या वेळेची मर्यादा वाढवून | नोंद घेतली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भूखंड ८.८.२०१३ रोजी ताब्यात घेतला आहे. त्यामुळे |

| | |
|---|---|
| मिळण्यासाठी १९ सप्टेंबर १९९८ ते ३१ मार्च २०१२ या कालावधीसाठी बिना परत न मिळण्याच्या तत्त्वावर ४१.१५ लाख रुपयांच्या अतिरिक्त अधिमूल्य रकमेचा यात समावेश आहे. हा खर्च त्यामुळेच स्थायी मता - जमिनीचे लीज भांडवल या सदराखाली वर्ग करण्यात आला आहे.<br>त्यामुळेच नफा आणि स्थायी मत्ता या नोंदीत ४१.१५ लाख रुपयांचा समावेश आढळून येतो. | महामंडळाने त्यांच्याकडे २६.१०.२०१५ रोजी लिहलेल्या पत्रानुसार परतावा देणेबाबत कळविले आहे. त्यामुळे महामंडळाने कुठलेही अतिरिक्त अधिमूल्य स्थायी मत्तेमध्ये दाखविलेले नाही. |
| **टिपण्या उघडकरचे भाष्य**<br>**४.** अहमदनगर आणि कोल्हापूर येथील गोदामांच्या लीजबाबतचे दोन्ही कंपन्यांमध्ये करार करण्यात आला आहे. हे भाडे अनुक्रमे सप्टेंबर २००९ ते ऑक्टोबर २००९ या कालावधीपासून लागू करण्यात आले आहे. कंपनीने जुलै २०१० ते मे २०११ या कालावधीसाठी अहमदनगर व कोल्हापूर येथील गोदामासाठी डिसेंबर २०१० ते मे २०११ या कालावधीसाठी देयक दिलेले नाही.<br>त्यामुळेच दोन्ही कंपन्यांकडून ७७.०६ लाख रुपयांचे भाडे वसूल करणे बाकी आहे. याबाबतची नोंद टिपण्णी मध्ये घेण्यात यावी. | वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या लेख्यांच्या टिपण्णीत नोंद घेण्यात येईल. |
| **महत्त्वपूर्ण लेखा धोरणे**<br>**५.** महामंडळाला जागतिक व्यापार केंद्रातील जागा ६० वर्षांच्या लीजवर घेण्यासाठी २५.४० लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. याचा ६० वर्षांसाठी प्रतिलेखित करावयाचा आहे, तेव्हापासून दरवर्षी अनुदानातील ०.४२ लाख रुपयांची रक्कम ही अन्य उत्पन्न या सदराखाली दाखविण्यात येते. महत्त्वपूर्ण लेखा धोरणातील शासकीय अनुदानाबाबतच्या लेखा मानक १२ नुसार शासकीय अनुदानाची रक्कम तसेच घसारा याबाबतचा ताळमेळ वित्तीय विवरणातील स्थायी मत्तेच्या सदरात निर्देशित करण्यात येतो. | वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या लेख्यांच्या टिपण्णीत नोंद घेण्यात येईल. |
| **इतर भाष्य**<br>**६.** दरवर्षी होणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठी कुठलीही ठोस प्रणाली कंपनीकडे नाही. त्यामुळे खर्च व त्याची तरतूद त्या-त्या वर्षी करण्यात येते. त्यामुळे कंपनीच्या वित्तीय निकालांवर त्याचे काहीवेळी विपरित परिणाम दिसून येतात. | यापुढील काळात त्या - त्या वेळी होणाऱ्या खर्चाबाबतची तरतूद ही याच्या अगोदरच्या काळातील अंदाज यानुसार करण्यात येईल. |

## महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ
## दिनांक ३१ मार्च २०१३ रोजीचा ताळेबंद

(रक्कम रुपयांत )

| तपशील | टिप्पणी क्र. | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|---|
| **I) भागभांडवल व देयता** | | | |
| **१. भागधारकांचा निधी** | | | |
| अ. भागभांडवल | २ | १४५,००९,९०० | १४५,००९,९०० |
| ब. राखीव निधी व शिल्लक | ३ | ३८०,७३१,५१५ | ३२३,४३४,३०८ |
| **२. इतर चालू देणी** | | | |
| **अ. दीर्घ मुदतीचे कर्ज** | ४ | १९,५४५,०३८ | १९,५४५,०३८ |
| **३. चालू देणी** | | | |
| अ. व्यापारी देणी | ५ | १,२९१,४१९,५९६ | १,१७०,२३६,५८२ |
| ब. इतर चालू देणी | ६ | १,०६५,४८६,७७६ | १,११७,४५६,५४१ |
| क. अल्प मुदतीच्या तरतूदी | ७ | २९४,३६७,३३८ | २४२,३०४,७७२ |
| **एकूण** | | **३,१९६,५६०,१६३** | **३,०१७,९८७,१४१** |
| **II) मत्ता** | | | |
| **१. इतर चालू मत्ता** | | | |
| अ. स्थिर मत्ता | | | |
| i) मूर्त मत्ता | ८ | १२९,०४९,८९० | १३८,७०३,७२९ |
| ब. इतर चालू गुतवणूक | ९ | १०३,२५० | १०३,२५० |
| क.इतर चालू मत्ता | १० | २८,००६,२२९ | २७,१७५,५८९ |
| ड.प्रलंबित करमत्ता (निव्वळ) | ११ | ८,६३७,२५५ | ७,५७२,६९३ |
| **२. चालू भत्ता** | | | |
| अ. गुंतवणूक | १२ | ११,९४३,७३७ | ८,०३०,९०४ |
| ब. व्यापार प्राप्त | १३ | १,३९२,९४१,३५८ | १,२०९,६५५,३७८ |
| क. रोख आणि रोख तत्सम | १४ | १,१२५,०४४,७६३ | ८२५,३७२,३५९ |
| ड. अल्प मुदतीची कर्जे व अग्रीमे | १५ | ३५२,९९४,९०१ | ६८६,५२९,१९७ |
| इ. इतर चालू मत्ता | १६ | १४७,८३८,७७९ | ११४,८४७,०४० |
| **एकूण** | | **३,१९६,५६०,१६३** | **३,०१७,९८७,१४१** |
| महत्त्वपूर्ण लेखा धोरणे | १ | | |

लेख्याचा भाग असलेल्या लेख्यावरील टीप पहा.

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार
**ओम प्रकाश एस चपलोत अँड कंपनी**
**सनदी लेखापाल**
**(संस्था क्रमांक ०००१२७ सी)**

**(यश पुंजावत)**
**भागीदार**
**सभासद क्र. ४१५५५२**
स्थळ : मुंबई
दिनांक : २७ मे २०१५

**संचालक मंडळाच्या वतीने व करिता**
**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित करिता**

**संचालक**   **व्यवस्थापकीय संचालक**

**मुख्य वित्तीय अधिकारी**   **कंपनी सचिव**

## महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ

## दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक

(रक्कम रुपयांत )

| | तपशील | टिप्पणी क्र. | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|---|---|
| i. | **उलाढालीतून उत्पन्न** | १७ | २,४२६,५९६,६५८ | ४,८७२,३७२,५१९ |
| | **एकूण** | | २,४२६,५९६,६५८ | ४,८७२,३७२,५१९ |
| ii. | **इतर उत्पन्न** | १८ | १४५,६८४,२१८ | १,०७,४०५,८०९ |
| iii. | **एकूण उत्पन्न (i+ii)** | | **२,५७२,२८०,८७६** | **४,९७९,७७८,३२८** |
| iv. | **खर्च** | | | |
| | अ) वापरलेल्या मालाची किंमत | १९ | २,३०६,२९५,७३१ | ४,६३३,००९,७१५ |
| | ब) तयार मालाच्या साठ्यातील बदल कामाची प्रगती व साठ्यातील माल | २० | (२,८१२,४८८) | (१०३,९११) |
| | क) कार्मचाऱ्यांच्या लाभावरील खर्च | २१ | ७७,९३५,७६२ | ६७,३९४,७२९ |
| | ड) वित्तीय किंमत | २२ | ३६१,३३९ | १,४८४,६४१ |
| | इ) घसारा व ऋणशिलकी | ८ | ३,१३६,५२८ | ३,३२३,९२८ |
| | ई) इतर खर्च | २३ | ५२,५५६,०८३ | ४९,८३०,४६४ |
| | **एकूण खर्च** | | **२,४३७,४७२,९५५** | **४,७५४,९३९,५६६** |
| v. | **अपवादात्मक व विशेष खर्चाशिवाय नफा / तोटा आणि कर (iii-iv)** | | १३४,८०७,९२१ | २२४,८३८,७६२ |
| vi. | **अपवादात्मक बाबी** | | | |
| | **अ) विंशेषात्मक बाबी** | २४ | २७,३०६,२१५ | ५,००९,६५२ |
| | **ब) इतर अपवादात्मक बाबी** | | - | - |
| vii. | **करपूर्व नफा / तोटा (v-vi)** | | **१०७,५०१,७०६** | **२१९,८२९,११०** |
| viii. | **कर- खर्च** | | | |
| | अ. चालू वर्षातील करावरील देय | | ४४,७४६,८२९ | ७४,३२८,६७२ |
| | ब. स्थगित कर | ११ | (१,०६४,५६१) | २२९,४२४ |
| | क. वर्षाअगोदरचा कर | | - | ४,७७१,०७६ |
| ix. | **कालावधीतील नफा किंवा तोटा (vii-viii)** | | **६३,८१९,४३८** | **१४०,४९९,९३८** |
| x | **प्रति समभाग उत्पन्न (प्रत्येकी १०रु.)** | | | |
| | १. मूळ | | ४४.०१ | ९६.८९ |
| | २. सुधारित | | ४४.०१ | ९६.८९ |
| | महत्त्वपूर्ण लेखा धोरणे | १ | | |

लेख्याचा भाग असलेल्या लेख्यावरील टीप पहा.
आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार
**ओम प्रकाश एस चपलोत अँड कंपनी**
**सनदी लेखापाल**
**(संस्था क्रमांक ०००१२७ सी)**
**(यश पुंजावत)**
**भागीदार**
**सभासद क्र. ४१५५५२**
स्थळ : मुंबई
दिनांक : २७ मे २०१५

**संचालक मंडळाच्या वतीने व करिता**
**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित करिता**

**संचालक** **व्यवस्थापकीय संचालक**

**मुख्य वित्तीय अधिकारी** **कंपनी सचिव**

## महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ
## दिनांक ३१ मार्च २०१३ अखेरचा रोख-ओघ विवरणपत्र

(रक्कम रुपयांत )

| | तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|---|
| १) | **कामकाज कार्यातून रोख ओघ** | | |
| | करपूर्वीचा उपवादत्मक व विलक्षण खर्चाशिवाय | | |
| | निव्वळ नफा वा तोटा | १३४८,०७,९२१ | २२४८,३८,७६२ |
| | **समायोजनासाठी** | | |
| | अधिक : घसारा | ३१,३६,५२८ | ३३,२३,९२६ |
| | वजा : नफा-तोट्याची मदत मंजूर | (४२,३३८) | - |
| | अधिक : बाजारातील जोखमीसाठी राखीव | ९५,५६७ | - |
| | वजा - व्याज आणि लाभांश उत्पन्न | (८५१,०५,८४९) | (४२६,५५,६४२) |
| | अधिक : व्याजावरील खर्च | | ११,९७,०५५ |
| | अधिक : शिल्लक लेखी बंद | - | ४७,१७३ |
| | **खेळत्या भांडवलाच्या बदलापूर्वीचा व्यापारी नफा** | **५२८,९१,८२४** | **१८६७,५१,२७५** |
| | किरकोळ ऋणकोत झालेली वाढ अथवा घट | (१८३२,८५,९७९) | २३७,५२,८५९ |
| | वस्तूसूचित झालेली वाढ किंवा घट | (३९,१२,८३३) | (७,१०,४६२) |
| | ठेवी-कर्जे-अग्रिमे यात झालेली वाढ किंवा घट | (२९९७,०८,९१७) | (२५२८,६०,९६२) |
| | किरकोळ धनकोत झालेली वाढ किंवा घट | १२११,८३,०१४ | (४१४,९८,९०१) |
| | इतर दायित्वात झालेली वाढ किंवा घट | (५१९,६९,७६६) | ५५२४,६७,४१८ |
| | निवृत्तीवरील तरतूदीमध्ये झालेली वाढ किंवा घट | ७३,१५,७३७ | ५८,३७,०२९ |
| | रोख-ओघच्या कार्यातून मिळणारे | २४१९,३०,९१४ | ४७३७,३५,२५६ |
| | रोख - ओघ सामान्य वस्तूचा | २४१९,३०,९१४ | ४७३७,३५,२५६ |
| | विशेष बाबींचा ओघ | २७३,०६,२१५ | ५०,०९,६५२ |
| | **व्यापारी कार्यातून झालेला निव्वळ रोख ओघ** | **२१४६,२४,६९९** | **४६८७,२५,६०४** |
| २) | **गुंतवणूक कार्यातून झालेला रोख ओघ** | | |
| | स्थिर मत्तेतील वाढ अथवा घट | (५८,१४५) | (८०,३६,७६२) |
| | गुंतवणूकीत झालेली वाढ अथवा घट | - | ९४,९०० |
| | मिळालेले व्याज व लाभांश | ८५१,०५,८४९ | ४२६,५५,६४२ |
| | गुंतवणूक कार्यातून झालेला रोख ओघ निव्वळ | **८५०,४७,७०४** | **५०७,८७,३०४** |
| ३) | **वित्तीय कार्यातून झालेला रोख ओघ** | | |
| | मुदत ठेवीतील वाढ किंवा घट | - | (९४७,२१,८४२) |
| | वजा - व्याज | - | (११,९७,०५५) |
| | वित्तीय कार्यातून प्राप्त निव्वळ रोख ओघ | | **(९५९,१८,८९६)** |
| | रोखीतील निव्वळ वाढ | **२९९६,७२,४०३** | **४२३५,९४,०१२** |

| | | |
|---|---|---|
| रोखीचा प्रारंभीचा ओघ | ८२५३,७२,३५९ | ४०१७,७८,३४७ |
| रोखीचा अखेरचा ओघ | ११२५०४४७६३ | ८२५३७२३५९ |
| नोंद | | |
| शिल्लक रोकड | ९८,४८० | १,१५,२१३ |
| मुदत ठेवी | ९९९५,३६,२६१ | ५२६१,२४,८२६ |
| बँक खाती | १२५४,१०,०२२ | २९९१,३२,३२० |
| | **११२५०,४४,७६३** | **८२५३,७२,३५९** |

**महत्त्वपूर्ण लेखा धोरणे १**

रोख ओघे विवरणपत्रावर असलेल्या लेखेप्रमाणक - ३ प्रमाणे अप्रत्यक्ष पद्धतीने त्वरित रोख विवरणपत्र तयार केले आहे.
हे रोख ओघे विवरणपत्र कंपनी (लेखांकन मानक) नियम २००६ च्या अनुषंगाने आहे.

हे रोख ओघे विवरणपत्र आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार,

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार
**ओम प्रकाश एस चपलोत अँड कंपनी**
**सनदी लेखापाल**
**(संस्था क्रमांक ०००१२७ सी)**

**(यश पुंजावत)**
**भागीदार**
**सभासद क्र. ४१५५५२**
स्थळ : मुंबई
दिनांक : २७ मे २०१५

**संचालक मंडळाच्या वतीने व करिता**
**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित करिता**

**संचालक** **व्यवस्थापकीय संचालक**

**मुख्य वित्तीय अधिकारी** **कंपनी सचिव**

-

## महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ
## दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या लेख्यांचा भाग असणाऱ्या

## लेखा धोरणे आणि टीपा

### टीप -१ - महत्वपूर्ण लेखा धोरणे

**अ) प्रपत्रे तयार करण्याचा आधार**

भारतात सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखा तत्वानुसार, कंपनीज (लेखे प्रमाणक) नियम २००६ मध्ये निर्देशित केलेल्या व लागू असलेल्या लेखे प्रमाणकानुसार आणि कंपनी कायदा १९५६ मधील संबंधित तरतुदी व त्यासह संबधित लागू असलेल्या विभाजन, वर्गीकरण महसुल ओळख आणि महामंडळाने केलेली खर्चाची अंमलबजावणी यास अनुरुप ऐतिहासिक परिव्ययाद्वारे, वाढीआधारे लेखांकन करुन वित्तिय पत्रके तयार करुन सादर केली आहेत.

**ब) अंदाजाचा वापर**

सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखातत्वाना अनुरुप वित्तिय पत्रके तयार करण्यात आली आहेत. व्यवस्थापनाने व्यक्त केलेले काही अंदाज व गृहितके, मत्ता आणि दायित्वे, महसुल आणि खर्च यांच्या सादर केलेल्या रकमा आणि आकस्मिक दायित्वाचे सादरीकरण हे वित्तिय पत्रकाच्या तारखेपर्यंत आहे. प्रत्यक्ष परिणाम आणि या अंदाजात भिन्नता असू शकते. व्यवस्थापनाने वित्तिय पत्रके तयार करताना वापरण्यात आलेले अंदाज खरे मानले असून ते योग्य व वाजवी आहेत. लेखांकन अंदाजात काही सुधारणा संभाव्य म्हणून मानल्या आहेत.

**क) स्थिर मत्ता**

अ) स्थिर मत्ता सर्व गौण खर्चासह व मत्ता वापरात येण्याच्या तारखेपर्यंत परिव्ययाने दर्शविल्या आहेत.
ब) भाडेपट्टीच्या जागेबाबत मूळ किंमतीचे मुल्यांकनकाराकडून पुनर्मुल्यांकन करण्यात आले असून ते लेख्यात मानण्यात आले आहे.

**ड) घसारा**

कंपनी अधिनियम १९५६ च्या अनुसूची १४ मध्ये विहीत केलेल्या दरानुसार सरळ रेषा पध्दतीने स्थिरमत्तेवर खालील बाबी वगळता घसारा आकारण्यात आला आहे.
१. मत्तेची प्रत्येक बाब जिचे मुल्य रु. ५०००/- पर्यंत आहे अशा बाबींवर १०० टक्के घसारा आकारण्यांत आला आहे.
२. ज्या भाडेपट्टीवरील जागेचे पुनर्मुल्यांकन केले आहे त्याचा घसारा पुढील बाकी असलेल्या भाडेपट्टी कालावधीपर्यंत केला आहे.

**ई) गुंतवणूक**

गुतवणूक परिव्ययाने दर्शविलेल्या आहेत.

**एफ) वस्तूसूची**

कच्चा माल आणि मार्गस्थसाठा परिव्ययाने मुल्यांकित केला आहे, प्रक्रियेतील साठा प्राथमिक मुल्याने मुल्यांकित केला आहे, तयार माल परिव्ययाने मुल्यांकित केला आहे, व्यापारी माल परिव्ययाने किंवा बाजारी मुल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार मुल्यांकित केले आहे.

### जी) लेखांकनाचा आधार

कंपनी कायद्यातील १९५६ अन्वये संबंधित तरतुदीनुसार आणि भारतात सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखातत्वानुसार व ऐतिहासिक परिव्ययाच्या प्राप्य पध्दतीनुसार खालील बाबी वगळता वाढीआधारे वित्तिय पत्रके तयार करण्यात आली आहेत.

* विपणन व्यवहाराच्या बाबतीत सर्व विक्री आणि खरेदी व्यापारी पध्दतीने नोंदली जाते. विपणनामध्ये शासकीय विभागाना केलेली खरेदी आणि या खरेदीवर मिळणारी सूट किरकोळ धनकोकडून बीले प्राप्त झाल्यावर खरेदी म्हणून लेखांकित केली जाते आणि संबधित विक्री-बीले दिल्यानंतर लेखांकित केले जाते.

* विविध योजनांखाली सहाय्यक अनुदान, प्रलंबित आयकर परताव्यावरील व्याज हे पोच झालेल्या तारखेस लेखांकित करण्यात येते.

### एच) कर्मचारी निवृत्ती लाभ

* भविष्य निर्वाह निधी : अहवाल वर्षातील अदा केलेला/देय असलेला निधी, निवृत्ती निधीचा महामंडळाचा हिस्सा नफा तोटा लेख्यात खर्ची टाकण्यात आला आहे.

* उपदान : जीवन विमा निगमकडे कर्मचारी गट उपदान व जीवन विमा योजनेद्वारा उपदान दायित्व संरक्षित केले आहे.

* रजेच्या रोखीकरणाचे लेखे विभागणित मूल्यांकनानुसार निश्चित केले आहे.

### आय) मागील वर्षाशी संबधीत व्यवहार

पुर्वीच्या कालावधीचा खर्च जो चालू वर्षामध्ये अदा केला आहे आणि अहवाल वर्षात मिळालेले उत्पन्न जे उपार्जित पध्दतीने लेखांकित केलेले नव्हते ते मागील वर्षाचे व्यवहार म्हणून दर्शविले आहेत.

### जे) कर व्यवस्था

i) कर खर्च हा स्थगित व चालू कर मिळून आहे. चालू वर्षातील कर योग्य उत्पन्न व लेखेजोगे उत्पन्न यांच्यातल्या समायोजनाचा फरक व आधीच्या वर्षातील समायोजनेच्या फरकाचे प्रत्यावर्तन यांचा परिणाम स्थघित कर दर्शवत आहे.

ii) स्थगित कर हा ताळेबंदाच्या दिनांकाच्या वेळीचे लागू असलेले कर विषयक कायदे व कर दर यावर आधारित आहे. स्थगित कर मत्ता व दायित्व यावर बदललेल्या कर दराच्या परिणामाच्या वर्षाच्या अखेरीस नफा तोटा खात्यात दखल घेतली आहे, आणि त्यानुसार ताळेबंदात स्थगित कर मालमत्ता व दायित्व मध्ये हा फरक दर्शवला आहे.

iii) भविष्यात पुरेसे करयोग्य उत्पन्न उपलब्ध करून देण्याची माफक खात्री असलेल्या स्थगित कर मालमत्तेचीच दखल घेतली जाते.

### के ) आकस्मिक दायित्व व मत्तेसाठी तरतूद

एखाद्या जुन्या उपक्रमामुळे जर बँकेला चालू दायित्व असेल, जे फेडण्यासाठी लागणाऱ्या, खात्रीलायक अंदाज करता येईल, अशा संभाव्य संपत्ती उत्प्रवाहासाठी तरतूद करण्यात आली आहे. तरतूदीचे आजचे मूल्य न घेता ताळेबंदातील दायित्व फेडण्यासाठी लागणाऱ्या मूल्याचा उत्तम अंदाज घेऊन तरतूदीचे मूल्य केले आहे. ह्यांचा प्रत्येक दिवसाच्या ताळेबंदात आढावा घेतला जातो व ताज्या अंदाजानुसार त्याचे समायोजन केले जाते.

घटनापेक्षा दायित्वाची माहिती उघड केली जाते तेव्हा :

अ) जुन्या उपक्रमामुळे उद्भवलेल्या संभाव्य दायित्व, बँकेचा अंमल नसलेल्या, भविष्यातील एखाद्या अनिश्चित, एक वा अनेक, घडणाऱ्या वा न घडणाऱ्या उपक्रमामुळे जे अस्तित्वात येईल असे किंवा,

ब) दायित्व फेडण्यासाठी संभाव्य संपत्ती उत्प्रवाहाची जरूरी नाही, असे वा दायित्व फेडण्यासाठीच्या रकमेचा खात्रीलायक अंदाज बांधता येत नाही, असे जुन्या उपक्रमामुळे उद्भवलेले चालू दायित्व ज्याची दखल घेतली गेलेली नाही. संभाव्य किंवा चालू दायित्व ज्यासाठी संपत्ती उत्प्रवाहाची शक्यता अत्यल्प आहे, अशांसाठी कुठलीही तरतूद किंवा वाच्यता केलेली नाही. घटनेपेक्षा मत्तेची वित्तीय विवरण पत्रात दखल घेतलेली नाही, परंतु घटनेपेक्षा मत्तेचे नित्य मूल्यांकन केले जाते.

## टीप - २ - भागभांडवल

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| १.समदृष्टी भागभांडवल - अधिकृत<br>अ. समभाग प्रत्येकी रु. १०० चे (मागील वर्षाचे २००००० समभाग प्रत्येकी रु. १०० प्रमाणे) | २००,०००,००० | २००,०००,००० |
| ब. विक्री काढलेले १४५००९९ समभाग प्रत्येकी १०० रु. चे. (मागील वर्षाचे १४५००९९ भाग प्रत्येकी १०० रु. प्रमाणे) | १४,५०,०९,९०० | १४,५०,०९,९०० |
| क. आमदत्त भरणा केलेले १४५००९९ समभाग प्रत्येकी १०० रु. चे (मागील वर्षाचे १४५००९९ भाग प्रत्येकी १०० रु. प्रमाणे) | १४५,००९,९०० | १४५,००९,९०० |
| **एकूण रक्कम** | **१४५,००९,९००** | **१४५,००९,९००** |

### समभागांचा ताळमेळ

| तपशील | २०१२-१३ | | २०११-१२ | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम (रु.) | संख्या | रक्कम (रु.) |
| प्रारंभीचे शिलकी समभाग | १,४५०,०९९ | १४५,००९,९०० | १,४५०,०९९ | १४५,००९,९०० |
| अखेरचे शिलकी समभाग | १,४५०,०९९ | १४५,००९,९०० | १,४५०,०९९ | १४५,००९,९०० |

### शेअरच्या बाबतीत प्राधान्य, प्रतिबंध याबाबतच्या अधिकारांचे निकष

कंपनीचे प्रथम श्रेणीचे समभाग प्रत्येकी १०० रुपये मूल्यांचे आहेत. प्रत्येक भागधारक हा मतदान करू शकतो. अंतरिम लाभांशाच्या बाबतीत वार्षिक सर्वसाधारण सभेत समभागधारकांनी संमत केल्यानुसार संचालक मंडळाच्या वतीने प्रस्तावित केलेला लाभांश समभागधारकांना वितरित करण्यात येतो. आपत्तीच्या वेळी कंपनीच्या उर्वरित मत्तेच्या वितरणानंतर उर्वरित रकमेचा त्या-त्या प्रमाणानुसार समभागधारक रकमा प्राप्त करून घेण्यास बांधिल आहेत.

### कंपनीच्या ५ टक्क्यांहून अधिक समभाग असलेल्या भागधारकांची यादी

| क्र. | समभागधारकाचे नाव | ३१ मार्च २०१३ अखेरीस | | ३१ मार्च २०१२ अखेरीस | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण समभाग | टक्केवारी | एकूण समभाग | टक्केवारी |
| १. | श्री. पी. बी. दांडेकर, उपसचिव,उद्योग विभाग आणि महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी | १,४४०,०९३ | ९९.३१ | १,४४०,०९३ | ९९.३१ |

## टीप - ३ - राखीव निधी व शिल्लक

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| **१. भांडवली राखीव निधी** | **४४,७८५** | **४४,७८५** |
| **२. निर्यात प्रोत्साहन निधी** | | |
| प्रारंभाची शिल्लक | ३७५,००० | ३७५,००० |
| अधिक मागील वर्षी नफा आणि तोटा पत्रकानुसार | - | - |
| **अखेरची शिल्लक** | **३७५,०००** | **३७५,०००** |
| **३. सहाय्यक अनुदान** | | |
| प्रारंभीची शिल्लक | १,०६५,४८१ | १,१०७,८१९ |
| नफा-तोटा खात्याकडे अंतरण | (४२,३८८) | (४२,३८८) |
| **अखेरची शिल्लक (३.१)** | **१,०२३,१४३** | **१,०६५,४८१** |
| **४. पैठणी विकास केंद्राकरिता निधी** | | |
| प्रारंभीची शिल्लक | १०,२९९,००० | १०,२९९,००० |
| मागील वर्षी नफा तोटा पत्रकानुसार | - | - |
| **अखेरची शिल्लक (३.२)** | **१०,२९९,०००** | **१०,२९९,०००** |
| **५. विपणन जोखीम व विकास राखीव निधी** | | |
| प्रारंभीची शिल्लक | ४,९००,४८९ | ४,६९९,६५६ |
| नफा-तोटा खात्याकडे अंतरण | ९५,५६७ | २००,८३३ |
| **अखेरची शिल्लक (३.३)** | **४,९९६,०५६** | **४,९००,४८९** |
| **६. पुनर्मूल्यांकन राखीव निधी** | | |
| प्रारंभीची शिल्लक | ६४,२१३,४४९ | ७०,७८८,९०९ |
| नफा-तोटा खात्याकडे अंतरण | (६,५७५,४६०) | (६,५७५,४६०) |
| **अखेरची शिल्लक (३.४)** | **५७,६३७,९८९** | **६४,२१३,४४९** |
| **७ शिलकीचा नफा आणि तोटा** | | |
| प्रारंभीची शिल्लक | २४२,५३६,१०४ | १०२,०३६,१६६ |
| अधिक - चालू वर्षातील निव्वळ नफा | ६३,८१९,४३८ | १४०,४९९,९३८ |
| **अखेरची शिल्लक** | ३०६,३५५,५४२ | २४२,५३६,१०४ |
| **एकूण** | **३८०,७३१,५१५** | **३२३,४३४,३०८** |

३.१ महामंडळाच्या वतीने जागतिक व्यापार केंद्रात २५,४०,२५० रुपयांच्या भाडेपट्टीवर ६० वर्षांच्या लीजवर जागा घेण्यात आली आहे. दरवर्षी ४२,३३८ रुपयांप्रमाणे ६० वर्षांसाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. त्यासाठी आतापर्यंत उपलब्ध झालेला निधी २५,४०,२५० रुपये इतका असून तो राखीव व वाढीव निधीअंतर्गत वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे दरवर्षी ४२,३३८ रुपयांचा निधी नफा - तोटा ताळेबंदात अंतरण करण्यात येतो.

३.२ पैठणी विकास केंद्राच्या उभारणीसाठी महामंडळाला यापूर्वी १,२६,९४,००० रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. महामंडळाने त्या निधीचा योग्य विनियोग करण्यासाठी महामंडळाने त्यातून ४९,९५,००० रुपयांच्या किंमतीचे यंत्रमाग खरेदी केले आहेत. त्यामुळे ४९,९५,००० रुपयांची वजा मिळालेल्या निधीत दर्शविण्यात आली आहे. महामंडळाला त्याशिवाय १०० यंत्रमाग खरेदी करण्यासाठी २१,००,००० रुपये इतके अनुदानदेखील प्राप्त झाले आहे. शासनाकडून २००९-१० या कालावधीत मिळालेल्या निधीतून ४९,९५,००० रुपयांची वजावट दाखविण्यात आली असल्यामुळे यंत्रमाग खरेदीसाठी मिळालेले २१,००,००० रुपयांचे अनुदान हे त्या निधीत समाविष्ट केले गेले आहे. त्याशिवाय पैठणी साडी केंद्रातील कारागिरांसाठी नाशिक विभागाला मिळालेले ५,००,००० रुपयांचे उपयोगात न आणलेले अनुदान देखील शासकीय निधीत जमा केले आहे. त्यामुळे इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट यांनी निर्गमित केलेल्या लेखा प्रमाणक १२ नुसार शासकीय अनुदानात ही रक्कम दाखविली आहे.

३.३ विपणन जोखीम आणि राखीन निधीसाठी महामंडळाने यापूर्वी संमत केलेल्या ठरावानुसार ०.१ टक्के इतका निधी हा मिळालेल्या परताव्यातून जमा करण्यात येतो.

३.४ महामंडळाने ६५,७५,४६० रुपयांचा निधी हा लीजवरील जागेच्या किंमतीतील घट जुळवण्यासाठी पुनर्मुल्यांकन व तत्सम निधीसाठी वर्ग केला आहे.

## टीप - ४ - दीर्घकालीन अप्रतिभूत कर्ज

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासनाकडून<br>महाराष्ट्र शासनाचा कर्जावरी देय व्याज | १,३१८,०००<br>९०,४९,२९९ | १,३१८,०००<br>९०,४९,२९९ |
| उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासनाकडून<br>बीज भांडवल. महाराष्ट्र शासनाला ईपीपी योजनेंतर्गत<br>देय व्याज | ६,४०३,३३२<br><br>२७,७४,४०८ | ६,४०३,३३१<br><br>२७,७४,४०८ |
| एकूण | **१९५,४५,०३८** | **१९,५४५,०३८** |

अप्रतिभूत कर्जे जी उद्योग व कामगार विभाग आणि त्याच विभागाच्या बीज भांडवल योजनेंतर्गत असून २००७-०८ या वर्षापर्यंत व्याजासह दाखवण्यात आली आहेत. ही योजना आर्थिक विवरणात फार पूर्वी दाखवण्यात आली असून त्याचा ताळमेळ लागलेला नाही. ती कर्जे शासनाला परत दिली गेली नाहीत. त्याचा कालावधी फार जुना आहे. शासनानेही महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे ती मागितली नाहीत. त्यामुळे महामंडळाने त्याच्यावर २००७-०७ पासून व्याज देखील आकारले नाही.

## टीप - ५ - देय व्यापार

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (५.१) | - | - |
| इतर (५.२) | १,२९१,४१९,५९६ | १,१७०,२३६,५८२ |
| **एकूण** | **१,२९१,४१९,५९६** | **१,१७०,२३६,५८२** |

५.१ - सूक्ष्म, मध्यम व लघु संस्थांकडून ३१ मार्च २०१३ अखेरीस कुठलेही देय नसल्यामुळे त्यांच्या रकमा व त्याच्यावरील व्याज यांचा आकडा निरंक आहे. प्रलंबित रकमांवरील कुठल्याही प्रकारच्या व्याजाचा भरणा व्याज सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योग संस्थांना करण्यात आलेला नाही.
५.२. - रकमा पडताळणी, ताळा व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत.

## टीप - ६ - इतर विद्यमान दायित्व

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| अ) अन्य संस्थांची देणी (६.१) | १२,२१३,१७८ | ६,९२४,८५२ |
| ब) कच्चा माल, थकबाकी व परतावा | १४,८२५,७५० | १४,८२५,७५० |
| क) प्राप्त विपणन अग्रिमे | २४१,६१५ | २४१,६१५ |
| ड) राखीव रक्कम | २३८,८६७ | २३८,८६७ |
| इ) सुरक्षा ठेव किंवा इसारा रक्कम (६.२) | १८५,२७०,१०५ | १७३,०५५,८३६ |
| ई) इतर दायित्व (६.३) | ७२,६९५,२६४ | ४४,०४८,६६२ |
| उ) प्राप्त रकमा (६.४) | १७,७६५,४६० | ३,११२,४७६ |
| ऊ) कामगारांची देणी (६.५) | ९१३,८५३ | १,९२७,९२२ |
| एफ) अन्य संस्थांची थकबाकी (६.५) | ७३०,४९३,८८९ | ८३९,०४९,९८३ |
| जी) खर्चासाठी किरकोळ धनको | ३०,८२८,७९६ | ३४,०३०,५७८ |
| **एकूण** | **१,०६५,४८६,७७६** | **१,११७,४५६,५४१** |

६.१ सेवा कर दायित्व १,०७,४८,३७८ रु., केंद्रीय सेवा कर दायित्व ७९६,११४ रु. आणि महाराष्ट्र सेवा कर व मूल्यावर्धित कर यांचा देय अनुशेष १६,२९,४१६ यांचा समावेश आहे .रकमा पडताळणी व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत.

६.२ प्राप्त ठेवी १६,४१,१८,८५३ रु. असून रकमा पडताळणी व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत.

६.३ दायित्वावरील खर्चाची रक्कम ५,५८,५३,८५९ रु. असून या रकमा पडताळणी व जुळणीच्या अधीन आहेत. खर्चावरील रकमेत मुंबई पोर्ट ट्रस्टच्या २,७६,७७,६६७ रु. इतक्या जुन्या रकमेचे दायित्व आहे.

६.४ आयआयटीएफ २०१२ च्या २६,०३,४३६ रु. शिलकीचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या लेखा परिक्षकांनी निश्चित केल्यानुसार खर्चाच्या तुलनेत २०,३२,७२५ रु. इतक्या जादा रकमेच्या शिल्लक असून त्याचा ताळमेळ होणे बाकी आहे. व्यवस्थापनाच्या म्हणण्यानुसार, हा जमा लेखा पुस्तिकेत
गेल्या वर्षीच्या एकूण शिलकीत दाखविण्यात आली आहे.

६.५ सदर रकमा पडताळणी, ताळा व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत.

## टीप - ७ - अल्प मुदतीच्या तरतूदी

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| **अ. कामगार कल्याणार्थ तरतूदी** | | |
| ग्रॅच्युईटीसाठी तरतूद (७.१) | ९५,५८०,३९१ | ९१,३०६,०८५ |
| रजा रोखीकरण (७.२) | २४,६७०,५६७ | २०,६२९,१३६ |
| पाचव्या वेतन आयोग थकबाकी | १४५,४७० | १४५,४७० |
| **ब. कर तरतूदी** | | |
| कर तरतूदी वर्ष २००९-१० | १८,४८२,०३० | १८,४८२,०३० |
| कर तरतूदी वर्ष २०१०-११ | ३७,४१३,३७९ | ३७,४१३,३७९ |
| कर तरतूदी वर्ष २०११-१२ | ७४,३२८,६७२ | ७४,३२८,६७२ |
| कर तरतूदी वर्ष २०१२-१३ | ४४,७४६,८२९ | - |
| **एकूण** | **२९४,३६७,३३८** | **२४२,३०४,७७२** |

७.१ महामंडळाने एलआयसीच्या युनिटनिहाय करण्यात आलेल्या मूल्यांकनानुसार ग्रॅच्युईटीच्या रकमेसाठी ३२,७४,३०६ रू. इतकी तरतूद केली आहे. महामंडळाने ९,४५,८०,३९१ रु. च्या तुलनेत ग्रॅज्युईटी निधीसाठी एलआयसीकडे १२,०१,७४,७८७ रुपयांची गुंतवणूक केली आहे.

७.२ महामंडळाने रजा रोखीकरणासाठी प्रत्यक्ष मूल्यांकनानुसार २,४६,७०,५६७ रुपयांची तरतूद केली आहे.

## टीप - ८ - स्थिर मत्ता

| तपशील | स्थूल मत्ता | | | | घसारा | | | | निव्वळ मत्ता | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०१.०४.२०१२ रोजीचे मूल्य | वाढ | विक्री/ समायोजन | ३१.०३.२०१३ रोजीचे मूल्य | संचित घसारा | वर्षाकरिता घसारा | समायोजन | ३१.०३.२०१३ पर्यंत संचित घसारा | ३१.०३.२०१३ रोजीचे WDV मूल्य | ३१.०३.२०१२ रोजीचे WDV मूल्य |
| स्वामालकीची जमीन-वाडा | ७६,४२६ | - | - | ७६,४२६ | - | - | - | - | ७६,४२६ | ७६,४२६ |
| भाडेपट्ट्यावरील जमीन मूल्य १ | ११,३००,०३८ | - | - | ११,३००,०३८ | ४४,७६,३४६ | १७८,१५२ | - | ४,६५४,४९८ | ६,६४५,५४० | ६,८२३,६९३ |
| भाडेपट्ट्यावरील जमीन पुनर्मुल्यांकन | १९९,२१६,३६८ | - | - | १९९,२१६,३६८ | १३५०,०२,९१६ | ६,५७५,४६० | - | १४१५,७८,३७६ | ५७६,३७,९९२ | ६४२,१३,४५२ |
| कार्यालयीन जागा | ८,६१३,५९६ | - | - | ८,६१३,५९६ | ३१,६७,१३८ | १३२,८७६ | - | ३,३००,०१४ | ५,३१३,५८१ | ५,४४६,४५८ |
| भाडेपट्ट्यावर घेतलेल्या जमिनीवरील इमारत | ५५३,४७,९८० | - | - | ५५,३४७,९८० | ६२,९४,७७८ | ९००,६९४ | - | ७,१९५,४७२ | ४८१,५२,५०८ | ४९०,५३,२०२ |
| निवासी मालकीची घरे | ४,१०३,४७२ | - | - | ४,१०३,४७२ | १५,८९,९४५ | ६२,७५३ | - | १,६५२,६९८ | २,४५०,७७४ | २,५१३,५२६ |
| जागतिक व्यापार केंद्र येथील भाडेपट्ट्याच्या जागेवरील हक्क | २,५४०,२५० | - | - | २,५४०,२५० | १४,७४,७६३ | ४२,३३८ | - | १,५१७,१०१ | १,०२३,१५० | १,०६५,४८७ |
| संयंत्र व यंत्रसामग्री | ३,६७९,९९१ | - | - | ३,६७९,९९१ | ३६,५२,८६८ | ५,५११ | - | ३,६५८,३७९ | २१,६११ | २७,१२३ |
| फर्निचर आणि फिक्स्चर्स | ११,३५०,२८८ | ३७,६९५ | - | ११३,८७,९८३ | ९९,११,९५९ | १०३,७३५ | - | १००,१५,६९४ | १,३७२,२८९ | १,४३८,३२९ |
| कार्यालयीन साधनसामग्री | ९,४१९,०३६ | ७,१०० | - | ९,४२६,१३६ | ५९,२८,०४६ | ४४७,६०२ | - | ६३,७५,६४८ | ३,०५०,४८८ | ३४,९०,९९० |
| संगणक | २१,०९३,३२३ | - | - | २१,०९३,३२३ | १७४,८०,४८२ | १,१४४,५२७ | - | १८६,२५,००९ | २,४६८,३१४ | ३,६१२,८४१ |
| वीज जोडण्या | ८१७,७१० | - | - | ८१७,७१० | १०६,०५९ | ३८,८४१ | - | १४४,९०० | ६७२,८१० | ७११,६५१ |
| वाहने | २,७४९,२३० | - | - | २,७४९,२३० | २,६८६,०५४ | ६३,१७५ | - | २,७४९,२२९ | १ | ६३,१७६ |
| रु. ५००० पेक्षा कमी मूल्य असलेली मालमत्ता | ७८९,१०२ | १३,३५० | - | ८०२,४५२ | ७८९,१०२ | १३,३५० | - | ८०२,४५२ | - | - |
| पैठणी विकास केंद्र | १८२,२२६ | - | - | १८२,२२६ | १४,८५० | २,९७० | - | १७,८२० | १६४,४०६ | १६७,३७६ |
| एकूण | ३३१२,७९,०३६ | ५८,१४५ | - | ३३१,३३७,१८१ | १९२५,७५,३०६ | ९,७११,९८४ | - | २०२,२८७,२९० | १२९०,४९,८९० | १३८७,०३,७२९ |
| मागील वर्ष (३१-०३-२०११) | ३२३५,२६,३९३ | ९६,२५,६४३ | १,८७३,००० | ३३१२,७९,०३६ | १७३४,२४,६६७ | ९,८९९,३८९ | - | १९२५,७५,३०७ | १३८७,०३,७२९ | १४०८,४३,४५७ |

टिप : अ)ज्या वर्षापासून जागेचा ताबा घेण्यात आला आहे. त्या वर्षापासून भाडेपट्टी कालावधीच्या प्रमाणात ऋणफेडीची तरतूद करण्यात आली आहे. तथापी भाडेपट्टीच्या करारपत्रात नमूद केल्याप्रमाणे भाडेपट्टी करारपत्राच्या अंमलबजावणीनंतर ते लागू होईल.

ब) महामंडळाने जागतिक व्यापार केंद्र येथे असलेल्या भाडेपट्टी धारण हक्कावर घसारा आकारला आहे आणि तो तिच्या वापरायोग्य ६० वर्षांच्या कालावधीत कर्जफेड होईल.

क) स्थिर मत्तेचा काही वर्गाची प्रत्येक बाबतीत तपासणीधीन राहून लेख्यात घसाऱ्याची तरतूद करण्यात आली आहे की ज्या ठिकाणी तरुतूद करण्यात आलेली एकूण घसारा रक्कम ही त्याच्या मूल्यापेक्षा अधिक झालेली आहे.

ड) घसारा रक्कम रु. ३१३६५२४.०० (रु. ९७११९८४- रु. ६५७५४६०)

इ) महामंडळाने मुख्य कार्यालये व विविध शाखांमधील सर्व वस्तू तसेच स्थायी मत्तेची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र लेखापरिक्षण संस्थेची नेमणूक केली आहे. त्याची पडताळणी होत असून त्याचा अहवाल लेखापरिक्षण संस्थेच्या वतीने अद्याप अंतिम स्वरुपात तयार झालेला नाही.

## टीप - ९ - इतर चालू गुंतवणूका

(रकमा रुपयांत)

| तपशील | संख्या | दर्शनी मूल्य | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|---|---|
| १. ऑल इंडिया फॅब्रिक्स मार्केटिंग को-ऑप सो. लि. | १ | १,००० | १,००० | १,००० |
| २. महा. इंड. अँड टेक कन्स्लटन्सी ऑर्ग. लि. | १,००० | १०० | ४०,००० | ४०,००० |
| ३. महा. स्टेट हँडलूम को-ऑप. फेड. लि. | १ | २५० | २५० | २५० |
| ४. कृपानिधी लि. | ६२० | १०० | ६२,००० | ६२,००० |
| **एकूण** | | | **१०३,२५०** | **१०३,२५०** |

## टीप - १० - अन्य चालू मत्ता

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| १. भरणा केलेल्या अनामत ठेवी * | १०,३४२,५१६ | ९,८०७,३४९ |
| २. दूरध्वनी अनामत ठेवी | २२,००० | १४,५०० |
| ३. न्यायालयीन अनामत ठेवी | १७,१६९,४९६ | १६,९७५,६३८ |
| ४. निविदा ठेवी | ४७२,२१८ | ३७५,१०२ |
| **एकूण** | **२८,००६,२२९** | **२७,१७२,५८९** |

* दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या ठेवी ८०,०७,४२७ रुपये तसेच संशयास्पद वसूली ३ वर्षांहून अधिक काळ पडताळणी व जुळणीच्या अधीन आहेत. महामंडळाकडे याबाबतचा कुठलाही तपशील किंवा तरतूद या लेखांसाठी नाही.

## टीप - ११ - स्थगित कर मत्ता (निव्वळ)

३१ मार्च २०१३ अखेरीस स्थगित कर मत्तेतील फरक तपशीलनिहाय : (रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | | दि. ३१ मार्च २०१२ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | मत्ता | दायित्व | मत्ता | दायित्व |
| प्रारंभीची शिल्लक (प्रलंबित कर मत्ता) | ७५,७२,६९४ | २,९०,६७८ | ७८,०१,११७ | ३,३३,६१३ |
| रजा रोखीकरण | १३,११,२४२ | | | २,३५,२६६ |
| कलम ४० अ अन्वये अमान्य | ४३,९९७ | | ३,३९,४५६ | |
| **एकूण** | **८९,२७,९३३** | **२,९०,६७८** | **८१,४१,५७३** | **५,६८,८७९** |
| **निव्वळ स्थगित कर मत्ता *** | **८६,३७,२५५** | | **७५,७२,६९४** | |

* स्थगित कर मत्तेत वर्षभरता १०.६५ लाख रुपयांनी वृद्धी झाली.

## टीप - १२. साठा

(रकमा रुपयांत)

| तपशील | | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|---|
| १. कच्चा माल आणि पैठण केंद्रातील साहित्य | | २,१८४,२५२ | ५७१,०७३ |
| २. पैठणमधील प्रगती पथावरील कार्य | | ७९२,२१७ | १,३०५,०५१ |
| ३. तयार माल | | | |
| येवला येथील साठा | २,१८८,२८७ | | - |
| पैठण येथील साठा | ७६२,९७३ | | ७३६,२५९ |
| दिल्ली येथील साठा | ६,९०,३४० | | ६७६,७९४ |
| जागतिक व्यापार केंद्रातील साठा | ५,३१३,८१९ | | ३९६६,२८८ |
| फ्रँकिंग साठा | - | | ७७५,४३९ |
| मुख्यालयातील प्रदर्शन | ११,८४९ | | |
| | | ८,९६७,२६८ | |
| **एकूण** | | **११,९४३,७३७** | **८,०३०,९०४** |

## टीप - १३. व्यापार प्राप्ती

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| ६ महिन्यांपेक्षा अधिक काळ थकबाकी असुरक्षित - माल (१३.१) | ९४२,६९६,७६४ | ७९८,१७५,०१७ |
| ६ महिन्यांपेक्षा कमी काळ थकबाकी असुरक्षित - माल | ४५०,२४४,५९४ | ४११,४८०,३६२ |
| **एकूण** * | **१,३९२,९४१,३५८** | **१,२०९,६५५,३७९** |

१३.१ एकूण ६८,३८,६७,५४६ रु. (विद्यमान ७१,०३,५२,५४६ रु वजा पूर्वीची तरतूद २,६४,८५,००० रु. किरकोळ ऋणकोनुसार) रकमेची गेली तीन वर्षे व त्याहून अधिक काळ थकबाकी आहे. व्यवस्थापनाने ही रक्कम विपणन कार्यातील संशयास्पद बाबी तसेच कायदेशीर बाबींवरील खर्च या अंतर्गत निश्चित करण्याचे अद्याप ठरवलेले नाही. त्यामुळे संशयास्पद बाबींविषयी करण्यात आलेली तरतूद यासाठी लागू केली गेली नाही. (महामंडळाने ऋणको, धनको आणि अग्रिमे यांचा पडताळा करण्यासाठी सनदी लेखापालाच्या संस्थेची नियुक्ती केली आहे. सनदी लेखापालाच्या संस्थेच्या शिफारशी आल्यानंतर व्यवस्थापन शंकास्पद ऋण व अग्रिमे यांसाठी योग्य ती तरतूद करण्याचा व नसणाऱ्या धनकोंचे प्रतिलेखन करण्याचा विचार करेल. पण या संस्थेकडून ऋणको निर्लेखन व धनको प्रतिलेखन करण्याबाबत ठोस शिफारसी न आल्याने याबाबत काहीही कारवाई केलेली नाही.)

१३.२ मेसर्स मेटल ट्युब रोलिंग मिल्स (एमटीआरएम) कडून देय असलेल्या रु.८७३.०५ लाखाचा किरकोळ ऋणको मध्ये समावेश आहे. ही बाब लवादाकडे आहे. महामंडळाच्या वकीलांनी आपला अंतिम युक्तीवाद लवादासमोर माहे एप्रिल २०११ मध्ये पूर्ण केला आहे. लवादाने महामंडळाच्या बाजूने ३०.०६.२०११ रोजी निकाल दिला असून विरोधी पक्षास रु. १९ कोटी अनामत रक्कम भरण्याचा आदेश दिला आहे. एमटीआरएमने या निवाड्याला लवाद याचिकेद्वारा मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका उच्च न्यायालयाच्या उचित न्यायपीठाकडे वळवली आहे कारण ह्या न्यायपीठाकडे आर्थिक अधिकारक्षेत्र नाही.

१३.३ मेहता ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज (मनिष फोर्ज, पार्श्व, होलम आणि पृथ्वी) यांचे ऋणको ५६३.५९ लाख रुपये अदा करण्यास कसूर केली आहे. त्यामुळे महामंडळाने त्यांच्या विरोधात मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय, नागपूर येथे निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट कायद्याचे कलम १३८ अंतर्गत गुन्हेगारी दावा दाखल केला आहे. मनिष फोर्ज आणि पार्श्व यांच्या विरोधातील सुनावणी प्रलंबित आहे तर होलम स्टील यांचे प्रत्युत्तर येणे बाकी आहे. महामंडळाच्या वतीने सुनावणी दरम्यान आवश्यक असलेल्या सर्व बाबी पूर्ण केल्या गेल्या आहेत. आता हे प्रकरण न्ययालयाच्या निकालाच्या प्रतिक्षेत आहे. दरम्यान, विरोधी पक्षाने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५० लाख रुपयांची अनामत रक्कमदेखील भरलेली नाही.

१३.४ मेसर्स खुटाळे स्टील रोलिंग मिल्स प्रा. लि., सातारा ऋणको ज्याने वखार पत योजनेंतर्गत पुरवठा करण्यात आलेला कच्चा माल उचलला आहे. ज्याची रक्कम रु. ४७.५२ लाख इतकी थकीत आहे. सातारा न्यायालयात मे. खुटाळे यांच्या विरोधात सादर केलेल्या दाव्याचा निवाडा महामंडळाच्या बाजूने दिला आहे. सदर दावा वसुली आणि मूळ हुकूमनाम्याची अंमलबजावणी मुंबई उच्च न्यायालयाकडे सादर करण्यात आली होती. कारण संचालकांची अचल मालमत्ता मुंबईत स्थित होती. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा अर्ज मुंबई उच्च न्यायालयापुढे २१.०३.२०१२ रोजी सुनावणीसाठी आला. खटल्यातील वकिलांच्या अभावामुळे अर्थात अनुपस्थितीमुळे हे प्रकरण मुलभूतरित्या फेटाळण्यात आले. महामंडळाने या प्रकरणाला प्रस्थापित करण्यासाठी प्रस्तावाची पत्रिका दाखल केली आहे. हे प्रकरण अजून दाखल होणे बाकी आहे.

*सदर रकमा पडताळणी, ताळा व संबंधित जुळणीच्या अधीन आहेत.

## टीप - १४ - रोख आणि बँकेतील शिल्लक

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| **१. रोख आणि बँकेतील तपशील** | | |
| बँकेतील शिल्लक | १२५,४१०,०२२ | २९९,१३२,३२० |
| हातातील रोख रक्कम | ९८,४८० | ११५,२१३ |
| **इतर** | | |
| बँकेतील ठेवी (मुदत) | ९९९,५३६,२६१ | ५१८,८३०,३११ |
| भरणासाठी नियत ठेवी | - | ७,२९४,५१५ |
| **एकूण** | **१,१२५,०४४,७६३** | **८२५,३७२,३५९** |

## टीप - १५ - अल्प मुदतीतील कर्जे व अग्रिमे

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| असुरक्षित - चांगले विचारात घेतलेले | | |
| १. कामगारांची कर्जे (१५.१) | १,०३२,८३२ | १,७९८,२४८ |
| २. पूर्व खर्च | १३७,१९१ | ६३,०५४ |
| ३. आयकरांचा आगाऊ भरणा (१५.२) | १६,७५९,९०० | - |
| ४. कर वजावट (१५.२) | ११०,५८१,३४२ | ९२,१९०,०७७ |
| ५. सुरक्षित ठेवी (१५.२) | ९,६६१,७४८ | १०,८८१,८०७ |
| ६. इतर कर्जे व अग्रिमे (१५.३) | २१४,८२१,८८८ | ५८१,५९६,०११ |
| **एकूण** | **३५२,९९४,९०१** | **६८६,५२९,१९७** |

१५.१ औरंगाबाद आणि वांद्र येथील फ्रँकिंग विभागातील फ्रँकिंग मशीनच्या उडण्यामुळे झालेल्या गेल्या ३-४ वर्षांतील रु. १,३६,०७४ (औरंगाबाद येथील १५,१३९ रु. व मुंबई येथील १,२०,९३५ रु.) इतके नुकसान या अग्रिमांमध्ये समाविष्ट आहे. महामंडळ ते चुकलेल्या कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्याच्या प्रक्रियेत असल्याने त्याची तरतूद करण्यात आलेली नाही.

१५.२ या रकमा पडताळणी व जुळणीच्या अधीन आहेत.

१५.३ समाविष्ट बाबी -
अ. गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या किरकोळ धनकोच्या १५,३६,५४,६६७ रु. च्या नावे टाकलेली रक्कम.
ब. पुरवठादारांकडील ५,९५,००० रु. इतक्या अग्रिमांच्या रकमा पडताळणी व जुळणीच्या अधीन आहेत. त्याचबरोबर ६५,०७८ रु. इतक्या संशयास्पद रकमादेखील पडताळणी व जुळणीच्या अधीन आहेत.
क. मेसर्स इंटरनॅशनल स्टील इंडस्ट्रीज (आयएसआय) मुंबई यांच्याकडून घेतलेल्या कच्च्या मालाच्या व्यवहारापोटी दि. २४.११.२००१ रोजी रू. २९.४२ लाखाचे अग्रिम अदा करण्यात आले होते. रक्कम थकीत असल्यामुळे आणि आर्थिक गुन्हे शाखेकडे दि. २२.१२.२००४ रोजी एफआयआर दाखल केल्याने ही बाब चौकशीधीन आहे. तदनंतर महामंडळाने आयएसआय विरूद्ध दोन फौजदारी तक्रार दाखल केल्या आहेत. त्या महानगर दंडाधिकारी न्यायालय (एस्प्लेनेड), मुंबई यांच्यासमोर प्रलंबित आहेत. आरोपींच्या नवीन जागांची माहिती आम्ही न्यायालयाला दिली आहेत. न्यायालयाने त्यानुसार नव्या जागेवर अजामीनपत्र वॉरंट बजावलेले आहे. पुढील सुनावणी ०७.०४.२०१५ या दिवशी आहे. अजामीनपत्र प्रकरणाचा अहवाल प्रलंबित आहे.

## टीप १६ - इतर चालू मत्ता

(रकमा रुपयांत)

| तपशील | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| कंत्राटदारांच्या देयकांवरील आयकर | १,७५८,५३२ | १,६२०,६६९ |
| ८७-८८ नंतरच्या वेतनावरील आयकर | ७१,२०० | ५४,२०० |
| माल घेणाऱ्याची कर वजावट | ९३२,८९२ | ८४३,४५४ |
| २००३-०४ सालातील कर वजावट | ३०२,८४९ | ७५,२८५ |
| गोदाम व कार्यालयीन भाडे | १८,८२१,९४२ | २२,९७१,६७७ |
| बीजभांडवल योजनेतील अग्रिमे* | ३,४०९,७५१ | ३,४०९,७५१ |
| इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. * | ७९५,८२२ | ७९५,८२२ |
| आयपीसीएल * | १,०२२,१६७ | १,०२२,१६७ |
| आयपीसीएल विक्री | १९०,५३९ | १९०,५३९ |
| केरळ स्टेट इंड. प्रॉडक्ट्स | ४,६६८ | ४,६६८ |
| चर्मोद्योग विकास महामंडळ | २१३,८६८ | २१३,८६८ |
| नॅशनल क्राफ्ट कॉम्प्लेक्स | १३९,७६३ | १३९,७६३ |
| ग्रॅच्युईटी निधी | १२०,१७४,७८७ | ८३,५०५,१७८ |
| **एकूण** | **१४७,८३८,७७९** | **११४,८४७,०४०** |

**१६.१** - काही संस्थांची दीर्घकाळ प्रलंबित असलेले भाडे रु. ८३,०९,४९२.०० प्राप्त झाले आहे. नजीकच्या काळात त्यांची वसूली करणे शक्य होण्याबाबत महामंडळाला विश्वास असल्यामुळे त्याचा समावेश केला गेला नाही.

महामंडळाला हिंदुस्थान झिंक लिमिटेडकडून रु. ३५,४४,९१९.०० रुपयांचे ग्रहणीय भाडे स्वरुपात येणे आहे. हा खटला लवादाकडे गेला आणि त्याचा निवाडा महामंडळाच्या बाजूने देताना हिंदुस्थान झिंक लिमिटेडला रु. २७,४०,०४६.०० महामंडळाला द्यावयास सांगितले. या निवाड्याच्या विरोधात हिंदुस्थान झिंक उच्च न्यायालयात गेली आहे. हे प्रकरण उदयपूर न्यायालयात प्रलंबित असून त्याचा केस नंबर सीएमएम-३-१४ असा आहे. याबाबत महामंडळाने आपले लिखित म्हणणे १९.११.२०१४ या दिवशी सादर केले.

महाराष्ट्र लघु विकास महामंडळाने त्यांची गोदामे भाडे तत्त्वावर ठक्कर वेअरहाऊसिंग एजन्सी (टीडब्ल्यूए) यांना दिली आहेत. संस्थेने सदर गोदामं ५ संस्थांना पोटभाडेकरू म्हणून दिली आहेत. त्यामुळे महामंडळ आणि ठक्कर वेअरहाऊसिंग एजन्सीमध्ये वाद उत्पन्न होऊन ही बाब लवादाकडे सोपविण्यात आली आहे. लवादाने दि. ०८.१०.२०१० रोजी रु. २.५९ कोटी देण्याबाबतचा निवाडा महामंडळाच्या बाजूने दिला असून त्यावर ठक्कर वेअरहाऊसिंग एजन्सीने न्यायालयात पिटीशन सादर केले आहे. महामंडळाने टीडब्ल्यूएच्या दाखल केलेल्या याचिकेला आव्हान देणारे अपील विभागीय न्यायालयापुढे सादर केले आहे. महामंडळाचे अपील नोंदणी टप्प्यात आहे.

* या रकमा संशयास्पद असून त्यांची वसूली तसेच जुळणी ३ वर्षांपासून प्रलंबित आहे. त्याबाबत महामंडळाकडे कुठलाही तपशील नाही तसेच त्या रकमा जुळणीच्या अधीन असल्यामुळे लेखा पुस्तिकेत कुठलीही तरतूद करण्यात आलेली नाही.

## टीप १७ - कार्यामधून मिळालेला महसूल

(रकमा रुपयांत)

| तपशील | २०१२-१३ | | २०११-१२ | |
|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. |
| अ. उत्पादन निर्मितीवरील उत्पन्न | | | | |
| तयार केलेल्या कार्यातून | | | | |
| कच्चा माल विक्री | ११,३६१,७३८ | | ४५,४१६,८६८ | |
| विपणन विक्री | १,९८३,३७८,८९४ | | ४,००७,०५१,८५० | |
| पैठणीतील साडी केंद्रातील विक्री | ३,०३७,७९७ | | ६,३०६,१६० | |
| येवला केंद्रातील साडी विक्री | १,०४४,५५८ | | - | |
| माल वाहतूक विक्री | २,२६९,१९२ | | ३,९३४,५५५ | |
| कोळसा विक्री | २९०,५०९,६६५ | | ५३१,३६८,१० | |
| जागतिक व्यापार केंद्रातील | - | | ८,६८१,८८१ | |
| कक्षातून झालेली विपणन विक्री | २,२९१,६०१,८४३ | | ४,६०२,७५९,४१७ | |
| वजा - माल वाहतूक विक्री | (२,२६९,१९२) | २,२८९,३३२,६५१ | (३,९३४,५५५) | ४,५९८,८२४,८६२ |
| एकूण (अ) | | २,२८९,३३२,६५१ | | ४,५९८,८२४,८६२ |
| ब. इतर कार्यातून मिळालेला महसूल | | | | |
| भंगार विक्री | ३५१,११२ | | ३,९२० | |
| फ्रँकिंग विक्री | ७७४,११० | | १३,०८१,६७१ | |
| हस्तकला विक्री | ३२,१५१,६८९ | | ४७,५१६,७३८ | |
| एकूण जमा | १०३,९८७,०९६ | | २१२,९४५,३२९ | |
| एकूण (ब) | | १३७,२६४,००७ | | २७३,५४७,६५८ |
| **एकूण** | | **२,४२६,५९६,६५८** | | **४,८७२,३७२,५१९** |

## टीप १८ - इतर उत्पन्न

(रकमा रुपयांत)

| तपशील | २०१२-१३ | २०११-१२ |
|---|---|---|
| मिळालेले व्याज | ८५,०५५,८४९ | ४२,७९०,५१६ |
| अन्य गुंतवणूकीवरील लाभांश | ५०,००० | ५०,००० |
| मिळालेले भाडे | ५१,९१९,०३१ | ४८,६३४,०१० |
| इतर उत्पन्न | ८,६५९,३३८ | १५,९३१,२८३ |
| **एकूण** | **१४५,६८४,२१८** | **१०७,४०५,८०९** |

## टीप - १९ - मालाचा झालेला वापर

(रकमा रुपयांत)

| तपशील | २०१२-१३ | २०११-१२ |
|---|---|---|
| १. खरेदी | २,३०८,५६४,९२२ | ४,६३६,९४४,२७० |
| वजा - माल वाहतूक खरेदी | (२,२६९,१९२) | (३.९३४.५५५) |
| **एकूण** | **२,३०६,२९५,७३१** | **४,६३३,००९,७१५** |

